म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ३५८
REFBK-0019461
REFBK-0019461

ग्रं. सं. ठाणें
काव्य
3५८

REFBK-0019461
REFBK-0019461

काव्य 223

१८७१

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०

# प्रस्तावना.

कोणतीही भाषा मधुर विद्वज्जनमान्य व प्रौढ होण्यास तीमधील ग्रंथच कारणीभूत होत, असें पुरातन काळापासून चालत आलेल्या संस्कृत, लाटीन, ग्रीक वगैरे भाषांचे अवलोकनानें स्पष्ट कळून येतें. महाराष्ट्रभाषा अद्यापि त्यांच्या साम्यतेस पोंचली नाहीं, याचीं कारणें अनेक आहेत. त्याप्रमाणें मुख्यत्वें करून ती भाषा बहुत अंशीं स्वतः सिद्ध नसून संस्कृत बालभाषा, पारशी, उर्दू वगैरे भाषांचें मिश्रणानें, साह्यानें व अपभ्रंशानें जाहली असून तींत एखाद्या गहन विषयाचें प्रतिपादन करण्यापुरते शब्दांचा संग्रह कमी असल्यामुळें इतर संस्कृतासारख्या भाषांतून शब्द घेतल्याखेरीज पद्यतर काय परंतु गद्यात्मक ग्रंथही लिहिणें कठीण पडतें. बहुधा याचमुळें याभाषेंत असावे तितके ग्रंथही नाहींत. गेले शतकांत याभाषेचा एकावेळीं उत्कर्ष जाहला होता व त्यावेळीं मोरोपंत, वामन, रघुनाथपंडित, ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादि कवींनीं आपले बुद्धि कौशल्यानें ईस सुशोभित केलें. परंतु त्याकाळीं या भरतखंडाचें आधिपत्य हिंदुप्रभूकडे असून प्रभूची व प्रजेची भाषा एक असल्यामुळें वरील कवींच्या ग्रंथांचा योग्य उपयोग होऊन त्यांजकडून त्यांच्या काव्यांची उत्तम प्रसिद्धी जाहली. सांप्रतकाळीं या भरतखंडाची सत्ता परद्वीपस्थ लोकांचे हातीं गेली असून त्यांची रीति, स्थिति, भाषा वगैरे या भारती प्रजेच्या अगदीं उलट आहे; व "यथाराजातथाप्रजा" या ह्मणीप्रमाणें आह्मां हिंदुलोकांत सांप्रतकाळीं अनुकरण करण्याची रीति पडून जाऊन परद्वीपस्थ भाषांकडे आमचे लोक विशेष परिश्रम करून स्वभाषेकडे अगदीं दुर्लक्ष्य करितात. यावरून त्यांणीं इतर भाषांचें ज्ञान संपादन करूंनये असें आमचें ह्मणणें नाहीं, परंतु त्याकामीं ते जित

वेळ, पैसा व श्रम खर्चितात त्यापेक्षां अधिक, निदान तितका तरी त्यांणीं स्वभाषेकडे खर्चिला पाहिजे व असें केल्यावांचून या स्वभाषेचें उज्जीवन होण्याची आशा नाहीं. याकरितां या भरतखंडांतील प्रत्येक भाषाभिज्ञ मनुष्यानें यथाशक्त्या स्वभाषेंत गद्यपद्यात्मक ग्रंथ रचून तिची सेवा करणें हें सांप्रतकाळीं फारच इष्ट जाहलें आहे. हें मनांत आणून श्रीमद्भारतांतर्गत हरिवंश ग्रंथाचे आधारानें पारिजातकाख्यान प्राकृतभाषेंत पद्यरूपानें स्वदेशबांधवांस अर्पण करून स्वभाषेची सेवा करीत आहें. हा, असे प्रकारचे ग्रंथ लिहिण्याचा माझा पहिलाच परिश्रम असल्यामुळें यांत जें न्यून असेल तें सूज्ञवाचकानीं मला कळविलें असतां मी त्यांचे फार आभार मानून पुढें त्याची सुधारणा करण्याविषयीं यथाशक्त्या प्रयत्न करीन.

या काव्यांतील विषय, अर्थ लौकर लक्षांत येण्याकरितां येथें लिहिला आहे तो असाः—

कोणी एकेकाळीं श्रीकृष्ण, रैवतक पर्वतावर सर्व पत्न्यांसहित विहारास गेले असतां नारदमुनीनीं त्यांस एक पारिजातक पुष्प आणून दिलें. तें त्यांणीं आपली प्रियपत्नी जी पट्टराणी रुक्मिणी इजला प्रीतीनें दिलें. हें वर्तमान कृष्णाची दुसरी पत्नी सत्यभामा इजला कळतांच सापत्नभाव तिजमध्यें उत्पन्न होऊन कलहास प्रारंभ जाहला. श्रीकृष्णानीं सत्यभामेला संतुष्ट करण्याकरितां पुष्प तर काय परंतु प्रत्यक्ष पारिजातक वृक्षच स्वर्गाहून आणून देण्याचें तिजला कबूल केलें. त्याप्रमाणें त्याजकडून करविण्याकरितां त्या वृक्षासहित पतिदान करावें असा नारदानीं सत्यभामेस उपदेश केला. त्यावरून तिचे आग्रहास्तव वृक्ष आणण्याविषयीं कृष्णानीं प्रतिज्ञा केली. प्रथमतः सामोपचारानें वृक्ष मिळावा एतदर्थ नारदास श्रीकृष्णानीं स्वर्गीं इंद्राकडे पाठविलें परंतु इंद्रानें वृक्ष देण्याचें नाकबूल केलें यामुळें युद्ध होण्याचें ठरलें. इतक्यांत ही गोष्ट बृहस्पतीस कळून त्याणें यापासून इंद्राचा नाश होईल असें जाणून

इंद्राचा व श्रीकृष्णाचा, वामनावतारांचा पिता जो कश्यप त्याजला ही गोष्ट कळविली. त्याजवरून कश्यपानें शंकराचें आराधन करून उभय पक्षाचा नाश न होण्याविषयीं वरदान मिळविलें. नंतर इंद्र व श्रीकृष्ण या उभयतांचें घोर युद्ध जाहलें. तें चालत असतां वृक्षप्राप्तीविषयीं श्रीकृष्णानींही शंकरापासून वर मिळविला परंतु कश्यप मध्यें पडून उभयतांचें सख्य होऊन श्रीकृष्णास पारिजातकवृक्ष मिळाला. तो त्याणीं द्वारकेस आणून सत्यभामेच्या मंदिरासमीप लाविला. येणेंप्रमाणें कथाभाग विस्ताररूपानें पद्यात्मक वर्णिलेला आहे.

त्र्यंबक रामचंद्र शास्त्री जोशी गोठणेकर,
ग्रंथकर्ता.

[illegible stamp]

श्री

# पारिजातकाख्यान प्रारंभः

## गीतिछंद मंगलाचरण.

नूतन[1] पयोधरप्रभ गोप[2]वधूवसनचोर जो हरि तो ॥
नमुनि कथा वदतों मी कीं स्मरणें भक्तभवभया हरितो ॥ १ ॥

## आख्यानारंभ.

हरिवंशीं जनमेजय नृपति पुसे कृष्ण निजपुरा माजी ॥
केंवि वसे तें सांगा ज्या नित्य पुढें करी स्वयें मां[3] जी ॥ २ ॥
वैशंपायन कथि मग कृतदार[4]प्रभुचरित्र नृपतीतें ॥
यच्छ्रवणें[5] डोलाव्या सुरमुनिनर[6] सज्जनादि क ततीं तें ॥ ३ ॥
एके दिनिं रुक्मिणिच्या व्रतपूर्त्यर्थ[7] प्रभु स्त्रियां सहित ॥
रैवतकीं[8] गेला तें पर्व बरें होय भिक्षुकांस हित ॥ ४ ॥
षोडश सहस्र महिषी[9] पुत्र सदार[10] प्रमोद[11]युत गेले ॥
तेथें श्रीयदुरायें सस्त्रीक[12] द्विजें[13] सुतृप्त बहु केले ॥ ५ ॥

## कामदावृत्त.

पारणा करी कृष्णमंदिरीं ॥ रुक्मिणीसवें प्रेम अंतरीं ॥
बैसला असे तेचि अवसरीं ॥ ब्रह्मपुत्र[14] ये वल्लकी[15] करीं ॥ ६ ॥

---

१ सजल मेघासारखी आहे कांती ज्याची असा. २ गोपस्त्रियांची वस्त्रें हरण करणारा असा. ३ लक्ष्मी. ४ विवाहझालेल्या कृष्णाचें चरित्र. ५ ज्याच्या श्रवणानें. ६ देवादिकांचीं क ( मस्तकें ) त्यांच्या पंक्तीतें. ७ व्रतपारणेकरितां. ८ रैवतकनावाचे पर्वतावर. ९ राण्या. १० सपत्नीक. ११ आनंदयुक्त. १२ सपत्नीक. १३ ब्राह्मण. १४ नारद. १५ वीणा.

## गीती.

मुनि येतांचि उठोनी पूजियला सविधि[1] केशवें तंव दे ॥
मंदार[2]सुमा देखुनि द्या हें मज रुक्मिणी पतीस वदे ॥ ७ ॥
तें पुष्प रुक्मिणीतें दिधलें हरिनें तिणें शिरीं धरिलें ॥
नारायणं[3] चेतोहर कीं भासे द्विगुण रूप हो वरिलें ॥ ८ ॥

## नारद रुक्मिणीची व पुष्पाची स्तुति करितात.

विधिज[4] ह्मणे रुक्मिणितें हें पुष्प तुलाचि योग्य देवि सती ॥
त्वत्संगें सुम शोभे न सपत्नी[5] त्वत्समा मला दिसती ॥ ९ ॥
अम्लान पुष्प हें तुज सौभाग्य सुगंध रस मनोहर ते ॥
समशीतोष्णादिज[6] सुख देइल हर ज्यांत बहु[7]नीह रते ॥ १० ॥
जीं जीं पुष्पें इच्छी तीं तीं दे धारकासि हें सुमन[8] ॥
पृथ्वल्प[9] होत छंदें तृप्त करी नित्य सेवकां[10]सु मन ॥ ११ ॥
हरितें दुर्गंधातें देतें मालांबरादिकांस करी ॥
रात्रीस दीपकर्म हि यद्रूपें[11] हरीस अंधतमस करी[12] ॥ १२ ॥
क्षुत्तृड्व्यथादि पळवी कळवी निर्जर[13]सुखा सदा मळवी ॥
दुर्बुद्धिमुखा हें सुम याचिबळें रुक्मिणी प्रभुस वळवी ॥ १३ ॥
श्री[14] गिरिजा सावित्री पुलोमजा[15]दिक समस्त देवी हीं ॥
पुष्पें वरिती प्रेमें कीं जीं दुष्प्राप्य हो जगीं तींहीं ॥ १४ ॥
ऐसें पुष्प दिलें तुज हरिनें हें पाहुनी तुझ्या सवती ॥
सवतील अश्रुधारा कीं झाली रुक्मिणीच आवडती ॥ १५ ॥

---

१ विधियुक्त. २ पारिजातक पुष्पाला. ३ कृष्णचित्ताला हरणकरणारें असें दुप्पट रूपच काय तिणें स्वीकारिलें असें वाटे हें तात्पर्य. ४ नारद. ५ सवती. ६ थंडी व उन्हाळा सर्वकाळसारखेपणानें असल्यापासून जाहलेलें. ७ फार निरिच्छ. ८ पुष्प. ९ लहानथोर. १० धारण करणाराचे प्राण. ११ पुष्पतेज सिंहास. १२ हत्ती. १३ देवांच्या सुखाला. १४ लक्ष्मी व पार्वती. १५ इंद्राण्यादिक.

## रुक्मिणीस्तवानंतर परिचारिका कृष्णपत्न्यांस तो वृत्तांत कळवितात. कृष्णस्त्रिया नंतर प्रियाप्रिय भाव सुचवितात.

ऐसें वदे मुनी तों प्रेष्यांनीं[3] कळविलें सुवृत्तातें ॥
हरिमहिषींतें मग त्या ह्मणती ज्येष्ठाचि योग्य कुसुमातें[4] ॥ १६ ॥
परि तें न रुचे ऐकुनि विष्णु प्रियेंगात्र[5] सत्यभामेला ॥
खेद धरी न पतीच्या उपेक्षणें[6] जरि तिचा पिता मेला ॥ १७ ॥

### उपजातिछंद.

सत्यभामा कोपाचा आविर्भाव दाखविते.

तात्काळ कोपा चढली सुरक्त ॥ टाकूनि दे वस्त्र मनीं विरक्त ॥
नेसूनि शुक्लांबर[7] एक जीर्ण ॥गात्रस्थ भूषा[8] करिते विदीर्ण[9]॥१८॥
प्रविशुनि कोपगृहीं[10] मग काढी कोपाग्निच्या मुखीं ज्वाळा ॥
प्रियरोष चिन्ह[11] शुभ्रांबर बांधो तत्क्षणींच ती भाळा[12] ॥ १९ ॥

### रथोद्धताछंद.

सांद्र चंदन[13]सुरक्तपंक तो ॥ लावि वक्त्रकमळीं[14] तदंकें[15] तों ॥
दावि रोषज[16] सुचिन्ह शंकतो॥जो विलोकित भयेंहि कांपतो२०

हरिवंश विष्णुपर्व अ० ६५

---

१ दासी. २ बरावाईट. ३ दासींनीं. ४ पुष्पातें. ५ कृष्णाला प्रिय आहे शरीर जिचे अशा. ६ चालढकलीनें. ७ पांढरें वस्त्र. ८ अंगावरचे अलंकार. ९ नष्ट. १० राजेलोकांच्या बायका रुसल्यावर त्यांची बसण्याची एक जागा असते तें घर. ११ प्रेम कोपाचें सूचक. १२ कपाळा. १३ दाट रक्तचंदनाचा चिखल. १४ मुखकमलावर. १५ रक्तचंदनलेपाचें चिन्ह. १६ कोपापासून उत्पन्न झालेलें.

## सत्यभामेकडे कोपशांत्यर्थ कृष्णाचें आगमन व विनोदाचरण.

### गीति.

मुनि रुक्मिणीप्रति वदे तों हरि सत्यागृहासि आला हो ॥
चित्तज्ञ मनीं प्रियताकलहाचा घेतसे अधिक लाहो ॥ २१ ॥
रुषित[1]स्त्री जाणुनियां स्नेहें हळु जाय आंत भीरु[2] जसा ॥
द्वारीं सेवक ठेवुनि स्वामिपुढें सापराध[3]भृत्य तसा ॥ २२ ॥
दुरुनी स्त्रियेस पाहे जों कोपें खवळली जशी उरगी[4] ॥
हस्तींचें अब्ज[5] चुरी हरिची जों धडधडे बहुत उर गी[6] ॥ २३ ॥
ऐशा चेष्टा करुनी वस्त्रें मुख झांकुनी पडे जंव ती ॥
संधी जाणुनि शंकित गेला हरि भीतभीत शीघ्रगती ॥ २४ ॥
प्रेष्याजनासि संज्ञा करुनि हरि व्यजँन घेत हातांत ॥
हा तात त्रिजगाचा दावि तिला प्रेमभाव वार्तांत ॥ २५ ॥
तत्कुसुमसुगंध तिला येतांचि मुखस्थ काढिला पदर ॥
नदर न पोंचे उठतां पृष्ठीं तिळही तिच्या मनीं न दर ॥ २६ ॥

## सत्यभामा पुष्पगंध येतांच त्याचें कारण दासींस विचारिते तों कृष्णास तेथें पाहते.

दासींस पुसे सांगा गंधस्थल कोणतें असे येथ ॥
ऐसें बोलुनि मागें पाहे तों देखिला हरी तेथ ॥ २७ ॥

## सत्यभामा शोक नटून दाखविते.

नेत्रांतुनि अश्रुनिघे प्रभुला देखोनि तत्क्षणीं घाली ॥
खालीं वदन स्फुरती अधर[10] सुसद्गदित भारती[11] झाली ॥ २८ ॥

---

१ रागावलेली. २ भित्रा. ३ गुन्हेगारचाकर. ४ नागीण. ५ कमळ.
६ वाणी. ७ पंसा. ८ बाऱ्यांत. ९ भय. १० ओंठ. ११ वाणी.

## पुनः सत्यभामा उद्धटपणा दाखविते.

वक्र भ्रुकुटिकरूनी डोळे मोडोनियां करीं[1] वदनें[2] ॥
ठेवुनि ह्मणे भला तूं मद्दानोदक हि घेतलें वद न ॥ २९ ॥

## श्रीकृष्ण सत्यभामेचें शोकाश्रुमार्जन करून दुःख कारण प्रश्नपूर्वक तिची विनवणी करितात.

नेत्रांतूनि निघे जें पाणी खालीं धरूनियां पाणी[3] ॥
न्हाणी स्वोर[4]स्थल हरि मग तच्छोकासि तो मना आणी ॥३०॥
कमलांतुनि कमॅल[5] तसें नेत्रांतुन पाझरे किमर्थ जळ ॥
मध्यान्हीं कमलापरि रूपदिसे वक्र[6]ही नसें उजळ ॥ ३१ ॥
कौंकुंम वस्त्रात्यजुनी शुक्लचि कां नेसलीस सुश्रोणी ॥
न समय सुर[9]पूजेचा श्रांते[10] तुज वदो न देखतां कोणी ॥ ३२ ॥
गात्रीं[11] न दिसे भूषा चित्रस्थलें[12] अश्रुनें असे व्याप्त ॥
प्राप्त दशा ही कां तुज सांगे त्वच्छोक मज करी तप्त ॥ ३३ ॥

## मालिनी छंद.

तव वपु दिसतें कां भूषणो[13]च्छिन्न भाळीं ॥
सितवसन[14] कशाला सांग तें हो अकाळीं ॥
मजजवळि सखे कां बोलसीना प्रिये तो ॥
गहिंवर धरवेना शोभने क्षिप्र[15] येतो ॥ ३४ ॥

## भुजंगप्रयात.

तुझा मी असें सिद्ध विख्यात दासा ॥
अनुज्ञा करी तूझि आज्ञा उपासा[16] ॥

---

१ हातीं. २ तोंड. ३ हात. ४ आपलेउरस्थान. ५ पाणी. ६ मुख. ७ कुसुंबीतांबडेवस्त्र. ८ सुशोभित आहेत कटिभाग जीचे असे. ९ देवपूजेचा. १० श्रमास पावलेली. ११ शरीराचेठायीं. १२ वेलबुट्या काढण्याचें स्थान (ऊर.) १३ अलंकाररहित. १४ पांढरेंवस्त्र. १५ लौकर. १६ भक्ति.

अहो सुंदरी म्यां तुझें काय केलें ॥
असें दुःख तूतें सखे कां उंदेल्लें[1] ॥ ३५ ॥

## पद.

### " मजलावरिल सुभद्रा काय या चालीवर. "

भामे मजवरि धरिला रोष कारण सांग बरें ॥ ध्रु० ॥
कांगे नाहीं तुज उल्हास ॥ दिसतें सदन तुझेंचि उदास ॥
पाहुनि होतो मजला त्रास ॥ कां आयास त्वां केला ॥भामे०॥१॥
त्यजिला कांगे त्वां विश्वास ॥ माझा आहे जो विश्वास[2] ॥
वरिला कोपगृहीं कां वास ॥ अंग सुवास[3] कां नाहीं ॥ भामे०॥२॥
माझी भार्या तूं लडिवाळ[4] ॥ सुमगुंफित कां नसती वाल[5] ॥
शुक्लपटावृत[6] दिसतें भाल॥ तुज हि कुचाल कां सुचली ॥भामे०॥३॥
वचनसुधा[7] ही कामदुघा[8] ॥ तत्पानीं[9] मच्छ्रुति[10] सरघा[11] ॥
कळवीं असेल त्या मदघा[12] ॥ अनघा[13] मला बोल सुखें ॥भामे०॥ ४॥
समजावी यापरि हरि तो ॥ स्त्रीतें भक्तापत्[14] हरितो ॥
दूर भवाला जो करितो॥वरितो त्यास त्र्यंबक[15] हा ॥भामे०॥५॥३६॥

## गीति.

जैसा तुजवरि माझा अन्यावरि कीं नसे असा स्नेह ॥
सेवील सोडुनि घृत कैसा सारङ्ग आदरें स्नेह[16] ॥ ३७ ॥

### सत्यभामा शोकयुक्त भाषण करिते.

ऐसें इष्ट परोपरि बोले हरि नेत्र मार्जुनी मग तो ॥
वदवी झाली भामा माझी निश्चित दिसे च कठिण गती[17] ॥३८॥

---

१ उत्पन्न झालें. २ जगास. ३ सुगंध लावलेलें किंवा चांगलें वस्त्र नेसलेलें. ४ लाडकी. ५ केश. ६ पांढरे कपड्यानें गुंडाळलेलें. ७ वचनामृत. ८ कामोत्पादक. ९ तिच्याप्राशनाविषयीं. १० माझेकान. ११ मधमाशी. १२ माझ्या अपराधाला. १३ निष्कपट अशा मजपाशीं. १४ भक्ताची पीडा. १५ या नावाचा कवि. १६ तेल. १७ तरणोपाय.

मी तुजला तूं मजला जाणें तें व्यर्थ जाहलें आज ॥
काय अधिक बोलुनियां माझें आतां नसे तुला काज ॥ ३९ ॥
मी नित्य भक्त तुमची वागतसें सुखभावसी सरल ॥
हें जाणुनि धरिली ही कैतववृत्ती[1] अशी कशी तरल[2] ॥ ४० ॥
जरि मजवरि करिशि दया तरि हरि करि मज सुखें अशी आज्ञा ॥
तूं तप वनांत जाउनि करि तें मी सत्य करिन हो माज्ञा ॥ ४१ ॥
इतकें बोलुनि सुदती नयनांतुनि काढि ढळढळां नीर[3] ॥
घेउनि पीतपटांचल[4] वदनीं[5] तों भर्तृशुक्[6] न धरि धीर ॥ ४२ ॥

## ह० वि० प० अ० ६६

## पुनः श्रीकृष्ण सत्यभामेस शोककारण विचारितात.

कृष्ण ह्मणे हे सुभगे[7] त्वच्छोकं[8] मदंगें[9] फार जाळितसे ॥
कारण सांग बरें कीं मत्प्राणाचीच आण घालितसें ॥ ४३ ॥

## सत्यभामा रागावून कारण सांगते.

सत्यस्थितभर्त्याप्रति सत्या[10] बोले तदा सुसद्गदित ॥
जो मान तुवां दिधला तद्भंग[11] न आटवीच मद्रुदित[12] ॥ ४४ ॥
जें सुम मंदाराचें मुनिनें दिधलें तुला तुवां दिधलें ॥
स्वेष्ट जना मज वांचुनि हें कृत्य बरें असें कसें रुचलें ॥ ४५ ॥
अपरोक्ष[13] तुझ्या मुनिनें तीतें स्तविलें परंतु दर्शविली ॥
अस्मद्दुर्भगता[14] कां या अपमानासि मन्मती विटली ॥ ४६ ॥
सात्राजिती[15] प्रिया मज नान्या ऐसें कसें शठा[16] वदसी ॥
दिससी बाह्य मृदु परी कठिणोत्यंतं त्वमेव[17] मंतरसि ॥ ४७ ॥

---

१ कपटवृत्ती. २ चंचल. ३ पाणी. ४ पीतांबराचा पदर. ५ तोंडांत. ६ कृष्णाचा शोक. ७ सौभाग्ययुक्ते. ८ तुझा शोक. ९ माझें अंग. १० सत्यभामा. ११ त्याचा भंग. १२ माझें रडें. १३ समक्ष. १४ माझा हलकेपणा. १५ सत्राजितकन्या. १६ कपट्या. १७ तूं असा अंतःकरणांत फार कठिण आहेस.

## श्रीकृष्ण पारिजातक देण्याचें कबूल करून सत्यभामेची समजी करितात.

### कामदा.

ऐशियापरी सेर्ष्य[1] बोलतां ॥ कृष्णजी वदे सांत्व[2] तत्त्वतां ॥
पद्मलोचने कोप कां वृथा ॥ मी असें तुझा जाण सर्वथा ॥४८॥

### भुजंग प्रयात.

तिला पुष्पमात्रें प्रिये तोषवीली ॥ तुला वृक्ष देण्याकडे दृष्टि गेली ॥
ह्मणोनीच तेथें तशी युक्ति केली॥अशी नोळखीली तुवां माझि केली[3]४९

### साकी.

सत्यभामा वृक्ष मागते.

ऐसें ऐके भर्तृवाक्य तों भामा पतिस वदे ती ॥
द्या त्या वृक्षा मलाच जरि कीं आहे मजवर प्रीती ॥५०॥
माझ्या द्वारीं वाटिकांतरीं[4] लावा त्या मंदारा[5] ॥
तेथें येवो कुसुमें न्याया जो प्रिय तुमचो दारा[6] ॥ ५१ ॥

### गीति.

### कृष्णाची कबुली व सत्यभामेचा संतोष.

हरिनें तथास्तु ह्मणतां संतोषा पावली प्रिया जाया[7] ॥

### श्रीकृष्णाची वृक्ष आणण्याची योजना.

जाया स्नपनासि[8] उठे हरि लागे कार्य तेंचि योजाया ॥ ५२ ॥
ध्यातां मुनि ये तों हरि हस्तीं अर्चनसुपात्र[9] आला हो ॥
पूजी सत्येसह धरि चित्तांत मुनिप्रसाद हा लाहो[10] ॥ ५३ ॥
मग जेववी मुनीतें परमान्नें[11] भक्तिनें ऋषी जेवी ॥
हस्तक्षालुनि मग दे आशीर्वादा तया नमी देवी[12] ॥ ५४ ॥
मुनिची आज्ञा घेउनि सत्यान्वित[13] देव[14] होय विघसाशी[15] ॥

---

१ दुसऱ्याचा उत्कर्ष ज्यांत सहन नाहीं असें. २ समजी. ३ क्रीडा. ४ बागेमध्यें. ५ पारिजातकाला. ६ स्त्री (पत्नी) ७ पत्नी. ८ स्नानास. ९ पूजेचेंउत्तमपात्र. १० मिळवो. ११ दूधभातानें. १२ सत्यभामा. १३ भामायुक्त. १४ कृष्ण. १५ पंचमहायज्ञ करून शिलक अन्न जेवणारा.

आशी[1] देउनि नारद निघता झाला महेंद्रभवनाशी[2] ॥ ५५ ॥

## पुनः नारदमुनी सत्यभामेला पारिजात महिमा व त्या वृक्षासह त्वां पतिदान करावें असें कळवितात.

आकारिलें[3] हरीनें कृष्णा गानार्थ[4] शंभुच्या पुढती ॥
बहु कुसुमें हीं तेथें रुद्रशिरीं सुरकरांतुनी उडती ॥ ५६ ॥
हा वृक्ष कश्यपानें अदितिप्रीत्यर्थ सृष्ट[5] हो केला ॥
पुण्यव्रतार्थ[6] कळवी हें वृत्त मुनींद्र सत्यभामेला ॥ ५७ ॥
अदितींद्राण्यादि सत्या[7] स्वपतिस बांधूनि पुष्पदामानें[8] ॥
तरुशी[9] ग्रीवांदेशीं[10] देत्या झाल्या तदीयनामानें[11] ॥ ५८ ॥
म्यां तीं दानें घेउनि प्रतिनिधिनें[12] सोडिले पती त्यांचे ॥
साचें[13] सांगतसें चिरकाळ[14] व्रतकर्त्रिचा[15] पती वांचे ॥ ५९ ॥

### वृत्तस्रग्धरा.

ऐसा हा पारिजात द्रुम[16] सुरनदिच्या[17] तीरिं जन्मास आला ॥
पूर्वी मंदारनामें त्रिदशगण मुनीं माजिही ख्यात[18] झाला ॥
भामे देतों तुला हा जरि हरि वदला टाकि तूं गे भयाला ॥
या लाभें शीघ्र साधी हरिमहिषिवरे[19] सत्य लोकद्वयांला[20] ॥ ६० ॥

ह० वि० प० अ० ६७

## स्वर्गी जाणाऱ्या नारदाप्रत इंद्राजवळ पारिजात मागण्याविषयीं कृष्णाचें भाषण.

मग गंतुकाम[21] मुनितें बोले हरि जिष्णुला[22] असें आज्ञा ॥
केल्यावांचुनि कळवा[23] मत्कार्यसहाय[24] हो सुमंत्रज्ञा[25] ॥ ६१ ॥

---

१ आशीर्वाद. २ इंद्रलोकीं. ३ बोलाविलें. ४ गाण्यांकरितां. ५ उत्पन्न. ६ पतिदान व्रताकरितां. ७ पतिव्रता. ८ फुलांचे माळेनें. ९ पारिजातकाशीं. १० मानेचे ठिकाणीं. ११ पतींच्यानामोच्चारेंकरून. १२ तिळ कृष्णाजिन व सुवर्ण यांच्या मोबदल्यानें. १३ खरें. १४ बहुतकाळ. १५ पतिदान करणारीचा. १६ वृक्ष. १७ गंगेच्या. १८ प्रसिध्द. १९ कृष्ण पत्न्यांतवरिष्ठ. २० दोन्ही लोकांला (इहपर.) २१ जाण्यांस इच्छिणारा. २२ इंद्राला. २३ सांगा. २४ माझ्या कामास अनुकूळ. २५ चांगली मसलत जाणणाऱ्या.

मद्बंधुतां[1] पुरातन कळवी तेंच्चित्त[2] युक्तिनें वळवी ॥
पळवी हरिकार्पण्या[3] मी तल्लोलुप[4] अभीष्ट[5] जो फळ वी ॥ ६२ ॥
पुण्यव्रतफल इच्छिति शक्रा दादा तुझ्याच भावजयी ॥
तरु देउनि मग न्याकीं हो कळवुनि भाव हा मुने विजयी॥६३॥
ऐसें कार्य करा कीं नाकीं[6] तुमचा सुदूतगुण[7] पाहूं ॥
वाहुनि कार्य मनीं हें ह्मणवा वळवाचि नाकर्मपा[8] हूं ॥ ६४ ॥

## इंद्रापासून पारिजात मिळणें कठीण असें नारदमुनि कृष्णास कळवितात.

ऐसें हर्युक्त[9] श्रुत होतांचि हसोनि बोलता झाला ॥
मुनि कृष्णासि न देइल तरु शक्रें[10] मदें न नम्रता ज्याला ॥ ६५॥
पूर्वीं श्रीरुद्रानें हा तरु गिरिजार्थ[11] याचिला होता ॥
परि शचिलोभें सोडवि दावुनि सांबासि वृक्षलोलुपता[12] ॥ ६६ ॥
मग जो शंभु शिवाप्रियकरणार्थ[13] तदैव[14] [15]मंदरीं वन[16] तो ॥
करि यद्दर्शनमात्रें[17] शक्र शचीसह मला [18]सदेव नतो[19] ॥ ६७ ॥
जेथें शीतोष्णादिक छंदें होतें उमाप्रिया[20] सुखद[21] ॥
त्यांत मदांधांधक[22] शिरतांचि प्रभु होय त्यास सन्मुखद[23] ॥६८॥
ऐसा सुदुःखलभ्यचि[24] साध्य दिसे कृष्णजी न हा तरु[25] तों ॥
बांधवकलिमलपंकीं[26] न तुझा पक्षीशयान[27] हात रुतो[28] ॥ ६९ ॥

## सामोपचारानें इंद्र, पारिजात न देईल तर त्यास जिंकून आणूं असें नारदाला श्रीकृष्ण कळवितात.

कृष्ण वदे मुनिराया शंभूनें तो तरू नसे नेला ॥

---

१ माझा भाऊपणा. २ इंद्राचें मन. ३ इंद्राच्या लोभीपणाला. ४ सदा जो इष्टफल देतो त्या वृक्षाचा मी लोभी. ५ अभिप्राय. ६ स्वर्गीं. ७ चांगलें दूतपणाचें काम. ८ इंद्राला. ९ कृष्णानें सांगीतलेलें. १० इंद्र. ११ पार्वतीकरितां. १२ झाडाचा लोभीपणा. १३ पार्वतीचें प्रिय करण्यास्तव. १४ तेव्हांच. १५ मंदर नावाच्या पर्वताचे ठिकाणीं. १६ मोठी बाग. १७ ज्याबागेला पाहतांच. १८ देवांसहित. १९ नमस्कार करी. २० शंकराला. २१ सुखकारक. २२ मदोन्मत्त अंधकासुर. २३ उत्तम शिर छेदणारा. २४ फारकष्टसाध्य. २५ वृक्ष. २६ बंधुकलहरूपी चिखलांत. २७ गरुड आहे वाहन ज्याचें अशा कृष्णा. २८ रुपो.

त्याचें कारण जाणें तेणें तो भक्तकाम[१] पुरवीला ॥ ७० ॥
मी इंद्रानुज[२] आहें लालन करण्यांस योग्य आत्मजसा[३] ॥
विधिजा[४] उपाय करुनी वळवा शक्रास मुनि अनात्म[५] जसा॥७१
म्यां तों पण केला कीं सत्येशीं वृक्ष आणुनी देतों ॥
जातो नरकीं तो नर देतों ह्मणूनीं पुन्हा न जो दे तो ॥ ७२ ॥
पण माझा भ्रष्ट जरी तरि मग हा लोक केंवि वागेल ॥
जागेल जो न धर्मी लोकमुखें त्यास डाग लागेल ॥ ७३ ॥

### दिंडी.

देवगंधर्वी राक्षसादिकांनीं ॥ पणा मोडियलें नायकेंचि कांनीं ॥
असा मी जो लोकांत भक्तमानी॥तया निंदावें काय बायकांनीं॥७४॥

### गीति.

जरि पारिजात देइल न शची[७] चित्रित उरावरी हरिचें[८] ॥
करिन गदेनें ताडण कायकरी माजला करी हरिचें[९] ॥ ७५ ॥

ह० वि० प० अ० ६८

## कृष्णाचें वृक्ष आणण्याविषयीं प्रतिज्ञावाक्य ऐकून कृष्णाकडील वर्तमान स्वर्गी जाऊन नारदमुनी इंद्रास कळवितात.

कृष्णोदितं[१०] श्रुत असें होतांचि मुनि त्रिविष्टपासि[११] निघे ॥
त्या शर्वरींत[१२] सुख तें हरिकृतभर्गोत्सवोत्थ[१३] जाउनि घे ॥ ७६ ॥
उत्साहांतीं मुनितें जातां पूजी महेंद्र संमितींत[१४] ॥
भद्रासनीं[१५] बसवुनी यद्गत[१६] होतो दरिद्रसंमतीत[१७] ॥ ७७ ॥
मुनि बोले भूलोकीं गेलों हरिदर्शनार्थ आनर्ता[१८] ॥

---

१ भक्तमनोरथ. २ इंद्राचा धाकटा भाऊ. ३ मुलासारखा. ४ नारदा. ५ योगी जसा इंद्रिये वळवितो तसा. ६ इंद्राणीनें वेलबुट्या काढलेल्या. ७ इंद्राचें. ८ हत्ती. ९ सिंह. १० कृष्णाने सांगीतलेलें. ११ स्वर्गी. १२ रात्रींत. १३ इंद्राने केलेल्या उत्साहांत झालेलें. १४ सभेंत. १५ राजासनावर. १६ जीत प्राप्त झालेला. १७ दरिद्रमुक्त. १८ द्वारकेस.

तेणें मज पाठविलें जेणें कार्यार्थ घेतली नरता[1] ॥ ७८ ॥
गोड बहुत बोलुनि मग शक्र ह्मणे कीं किमर्थ पाठविलें ॥
तुजलाचि आठव्यानें[2] बहुकाळें बंधुलागि आठविलें ॥ ७९ ॥
नारद ह्मणें महेंद्रा[3] रैवतकीं देखिला तुझा अनुज[4] ॥
रुक्मिण्यादि सत्यां सह ज्या देखुनि कांपती भयें दनुज[5] ॥८०॥
तत्पत्नी विस्मयकर[6] पुष्प दिलें त्यांस[7] देखिलें त्यांणीं ॥
ह्मणती कीं मुनिराया या कुसुमाच्या गुणास वाखाणी ॥ ८१ ॥

## पृथ्वीछंद.

प्रसूनगुण[8] वर्णुनी हरिचिया स्त्रियां कश्यपा ॥
दिलें अदितिनें तरुसह मला वदें वज्रपा[9] ॥
तुलाहि दिधलें असें परिसुनी शचीनें त्रपा[10] ॥
धरूनि करुं लागल्या बहु तया व्रताच्या जपा ॥ ८२ ॥

## कामदा.

असति ज्या स्त्रिया त्यांत एक ती ॥ मुखर[11] वाटली जी मला सती ॥
वचन ऐकतो जो रमापती ॥ वदन देखुनी लुब्ध तो अती ॥ ८३ ॥

## दिंडी.

सत्यभामा हें नाम जीस पावे ॥ कृष्ण तीच्या आज्ञेंत नित्य धांवे ॥
भृंगें[12] जैसा पुष्करीं[13] स्थिरावे ॥ जिच्या सद्मीं[14] शेतांत जसे रावे॥८४॥

## गीति.

भामा लोभी तो हरि बोले तरु आणणें मला सहज ॥
शक्रा असें ह्मणें मज सांग महेंद्रासि हा तुझा सहजें[15] ॥ ८५ ॥
एतन्निमित्त[16] तरि ह्या अत्रत्यजना[17] प्रभो अचलशात[18] ॥

---

१ मनुष्यजन्म. २ दशावतारांत आठवा. ३ इंद्रा. ४ भाऊ. ५ दैत्य. ६ कृष्णस्त्रियांस आश्चर्य करणारें. ७ कृष्णास. ८ फुलाचे गुण. ९ हे इंद्रा. १० इंद्राणी आदिकरून स्त्रियांनी केलें, आह्मी केलें नाहीं याबद्दलची लज्जा. ११ बोलकी. १२ भ्रमर. १३ कमलामध्यें. १४ घरीं. १५ बंधु. १६ व्रतानिमित्त. १७ द्वारकावासीलोक. १८ पर्वतछेदका.

लाहो सुरद्रुकुसुमज[1] क्षपिता सुरदानवादिबल[2] शांत[3] ॥ ८६ ॥
मी लालनीय[4] आहें तरि पुरवा त्वद्वधू व्रताशा[5] ती ॥
देउनि अंग[6] सांग असें त्यां नगपक्षां[7] बळेंचि[8] जो शांती[9] ॥ ८७ ॥

## नारदानीं सांगितलेला कृष्णाचा निरोप ऐकून त्यावर इंद्र वृक्ष न देण्याच्या अडचणी नारदाजवळ दाखवितात.

ऐसें मुनिवदनें श्रुत होतांचि ऋषीस आसनीं बसवी ॥
देतों संदेशं असा तो जाउनि नारदा हरिस कळवी ॥ ८८ ॥
स्वबल विलोकूनि वदे मुनितें तत्काल शक्र संदेश ॥
कळवा मदीयकुशला[10] त्यासि पुसा कीं तुझा सुखी देश ॥ ८९ ॥
मत्सम ईश्वर जरि तूं परि सांप्रत भूतलीं असे जनि[11] तो ॥
तुझि धर्मरक्षणास्तव यास्तव तेथील पाळि सद्रीती[12] ॥ ९० ॥
मंदारादिक रत्नें आहेत तुझींच कीं मतिज्ञा[13] ते ॥
पुरवुनि ये स्वर्गीं मग करि तूं सत्याव्रता बकारातें[14] ॥ ९१ ॥
ब्रह्मकृतस्थिति[15] ऐशी आहे कीं हे पदार्थ सेवावे ॥
देवांनीं सुर भोग्यचि आह्मीं ते मानवीं[16] न सोडावे ॥ ९२ ॥
मोडिन विधिकृतमार्गा[17] तरि मज शापील ही विधि[18] सुरांद्य[19] ॥
यद्यपि शुद्ध असे जरि नाचरती कीं जगीं बहु अवंद्य[20] ॥ ९३ ॥
स्त्रैयर्थ[21] तरुतें देतां होतील अनल्प[22] खिन्न हे स्वस्थ[23] ॥
विधिकृत[24] नरसुख सेवुनी असु[25] बंधूचे न होत अस्वस्थ[26] ॥ ९४ ॥
मांसें खाउनि फुगला अभिमानें धर्म ही मना नाणी ॥

---

१ पारिजातक पुष्पापासून उत्पन्न झालेलें. २ खपविलें आहे दैत्यदानवादिकांचें सैन्य ज्याणें अशा हे इंद्रा. ३ सुख. ४ लाडका. ५ तुझ्या भावजयाची व्रत करण्याची आशा. ६ वृक्ष. ७ पर्वतपक्षांस. ८ छेदी. ९ निरोप. १० माझ्या खुशालीला. ११ उत्पत्ति. १२ सज्जनाची मर्यादा. १३ दुष्टसंहाराची. १४ हे बकासुर शत्रो. १५ ब्रम्हदेवानें केलेली मर्यादा. १६ मनुष्यलोकीं. १७ ब्रम्हदेवानें केलेल्या रस्त्याला. १८ ब्रम्हा. १९ देवश्रेष्ठ. २० फार निंद्य. २१ बायकोकरितां. २२ बहुत. २३ देव. २४ दैवानें दिल्हेलें. २५ प्राण. २६ घाबरे.

भाणी स्त्रीवंश[१] जो कीं अशि निघते तन्मुखांतुनी वाणी ॥९५॥
विधिकृत[२] धर्मार्थादिक सेवूनि सुखीच तो सुधी[३] राहो ॥
कृष्ण स्वर्गमनावधि[४] तदर्थ[५] तदीयधी[६] सुधीरा[७] हो ॥ ९६ ॥
जरि पारिजात देइन पौलोम्यादिक मला न मानितिल ॥
स्वःसुख[८] नर घेउनि मग तेथें स्वर्गा कधीं न मानि तिलें[९] ॥९७॥
जरि पारिजातसुख हें घेतिल नर कायहो मग विशेष ॥
राहिल देवनरांचा कळवा हा कृष्णाजीस मत्प्रेषं[१०] ॥९८॥
तेथें पुण्य करावें येथें भोगावयास हो यावें ॥
हा नेम विधात्याचा भंगुनि वृक्षास म्यां कसें द्यावें ॥९९॥
जरि या वृक्षगुणानें सुरतुल्यत्वास[११] पावले नर ते ॥
पूर्तेष्टीं[१२] एकहि नर जरि हें सुख तेथ जाहलें न रंते[१३] ॥१००॥
तत्कर्मतुष्ट[१४] आम्हीं वृष्टि[१५] करावी अशीच ही सृष्टी ॥
दृष्टि न कर्मी जाइल वृक्षसुखें पावतांचि नर तुष्टी[१६] ॥१०१॥
विधिजा[१७] सांग असें कीं अयोग्य तरुचेंचि सर्वथा नयनें[१८] ॥
अविचारें मागितला कृष्णा त्वां पाहिला मनीं नये[१९] न ॥१०२॥
मुनिराया कळवि असें कीं जेणें कृष्णाजी न हो रुष्ट[२०] ॥
तुष्ट असो जो निर्जरकार्यास्तव[२१] मारितो बहुत दुष्ट ॥१०३॥
हारांबरमण्यादिक भार्येष्ट[२२] रुचेल तें सुखें न्याकीं ॥
परि हा मंदारकुंटादानाचा[२३] रोष[२४] तुज नसो नाकीं[२५] ॥ १०४॥
देइन रत्नादिक परि हारादिकही न पारिजातातें ॥
जें वदलों हें कळवी कृष्णा तरुतो न येचि हातातें ॥१०५॥

---

१ बाइलवेडा. २ देवानें दिलेलें. ३ शाहाणा. ४ स्वर्गी येई पर्यंत. ५. झाडाकरितां. ६ कृष्णाची बुध्धी. ७ स्वस्थ. ८ स्वर्गसुख. ९ तिळभरसुद्धा. १० माझा निरोप. ११ देवांच्याबरोबरीस. १२ तळींवगैरे बांधणें व यज्ञादिक करणें याकामीं. १३ रमेल. १४ मनुष्यांनीं केलेल्या कर्मानें संतुष्ट. १५ पर्जन्य. १६ संतोष. १७ हे नारदा. १८ नेणें. १९ न्याय. २० कोपायमान. २१ देवकार्याकरितां. २२ स्त्रियेचे इछेप्रमाणें. २३ पारिजातवृक्ष न दिल्याचा. २४ राग. २५ नाकावर.

ह० वि० प० अ० ६९

## इंद्राचा वृक्ष न देण्याचा हेतु पाहून नारदमुनी पारिजात आणण्याची कृष्णाची प्रतिज्ञा इंद्रास कळवितात.

ऐशा महेंद्रवाक्या श्रुत होतां ब्रह्मपुत्र बोलतसे ॥
मोठा कलिप्रिय जरि झाला त्याला न येति बोल तसे ॥ १०६ ॥

### भुजंग प्रयातवृत्त.

महेंद्रा मला मान्य तूं सर्वदाची ॥
ह्मणोनी वदें गोष्ट बारे हिताची ॥
तुझा भाव हा बोललों तेधवांची ॥
परी ही प्रतिज्ञा असे माधवाची ॥ १०७ ॥
हरालागि पूर्वी दिलेंनाहि वृक्षा ॥
तुला केंवि देईल विस्तीर्णवक्षा ॥
तरी कृष्णजीला तरूची बुभुक्षा[3] ॥
स्वपक्षा कधीं सोडिना तो ऋभुक्षा[4] ॥ १०८ ॥
जरी म्या बरे हेतु ते दाखवीले ॥
परी नायकोनी कटू फार बोले ॥
जरी आजपर्यंत देवादि झाले ॥
परी बोल माझे न ते फोल गेले ॥ १०९ ॥

### गीति.

जरि पारिजात देइल न शचीचित्रित उरावरी हरिचें ॥
करिन गदेनें ताडण कायकरी माजला करी हरिचें ॥ ११० ॥

## वृक्ष देण्याविषयीं नारदमुनी आपला अभिप्राय इंद्रास देतात.

इंद्रा त्वद्बंधूचा निश्चय हा जाणुनी विचार करी ॥

---

१ नारद. २ रुंद आहे उर ज्याचे असा इंद्र. ३ घेण्याची इछा. ४ हेइंद्रा. ५ नदेण्यांचीं कारणें. ६ फुकट. ७ इंद्राचें. ८ हत्ती. ९ सिंहाचें.

तरु देणें मज वाटे हित यास्तव हट्ट बा मनीं न धरी ॥१११॥

**मग इंद्र, कोपायमान होऊन कृष्णाची निंदा करून मी ही युद्धावांचून पारिजात देत नाहीं असें नारदमुनीस कळवितात.**

ऐसें कृष्युक्त श्रुत होतां कोपा चढे अमित[१] शक्र ॥
काय करावें तेथें अपराधाविण जरी हरी वक्र ॥ ११२ ॥
पूर्वीं आचरला बहु अनिष्ट[२] परि सोशिले मुने विष्णु ॥
जिष्णु[३] असें जरि कृष्णीं बंधुत्वें जाहलों बहु सहिष्णु[४] ॥११३॥
खांडववनांत पूर्वीं मन्मेघें[५] निवारिलें बळें करुनी ॥
मद्यज्ञभंग[६] केला गोवर्धन सप्तदिन करीं धरुनी ॥ ११४ ॥
वृत्रवधाचे वेळीं साह्यार्थ तयासि मारिं हाकेला ॥
तेव्हां सम मी वदला तद्वांत भुजाबळेंचि हा केला ॥ ११५ ॥
ऐसा कनिष्ठ मदनुज जरि मोडी ज्येष्ठबंधु मर्यादा ॥
होवो कलह सुखें कीं न मानि जरि कृष्णजी मला दादा॥११६॥
साक्षी तुह्मी ऋषीश्वर फोडु गदाताडणेंचि मत्काय[९] ॥
परि तें शचीमृदितउरं[१०] फोडिन या बोलण्यांत गुण काय॥११७॥
जो स्त्रीजित नर होतो मातापितरांस आत्मबंधूंस ॥
मानि न तो कीं देतो सर्वहि सद्वस्तुतें[११] प्रियवधूंस[१२] ॥ ११८ ॥
ऐसा स्त्रीजित लोभी कृष्ण जरी बोलला धिगस्तु[१३] मला ॥
हें सोसवे न आतां युद्धालागीं करू च तो तुमुला[१४] ॥ ११९ ॥
स्त्रीपुत्रसहस्राधिक सद्वृत्तभ्रातृसम[१६] नसे कोणी ॥

---

१ पुष्कल. २ अप्रिय. ३ पराजय न पावणारा. ४ सहनशील. ५ माझे मेघ. ६ माझा इंद्र यज्ञाचा नाश. ७ वृत्रासुराचा संहार. ८ माझा भाऊ. ९ माझा देह. १० इंद्राणीनें उटी लावलेलें उर. ११ चांगल्या पदार्थांतें. १२ आवडत्या बायकोस. १३ धिक्कार असो. १४ तुंबळ. १५ बायको मुलां पेक्षां हजारपट अधिक. १६ सुस्वभावीभावासारखा.

जेथें बंधु नसे त्या जातां शून्यत्व होय दिक्कोणीं ॥ १२० ॥
आत्मस्तुतिवच निंदन परि करणे येतसे मुने समयीं ॥
बहुवार रक्षिलें त्या परंतु कपटेन वर्तते स मयि ॥ १२१ ॥
पूर्वी हरिचापज्या रुद्रवरें तोडितांचि दितिजांनी ॥
धनुरग्रोत्कृत्तशिरा झाला तत्काल इंदिराजांनी ॥ १२२ ॥
परि म्यां बंधुत्वास्तव शिर धरुनीं सांधिलें स्वतेजानें ॥
परि मज निष्ठुर वदतां आठविलें कीं नसेल तें जांनें ॥ १२३ ॥
प्रथम प्रहार तेणें केल्यावर मी तया प्रहारीन ॥
इतराहवांत ताडण करितों मी प्रथम दानवारी न ॥ १२४ ॥

## कामदा.

कृष्णमंतु तेफार सोशिले ॥ बाल जाणुनी बंधुते मुळें ॥
नित्य सत्य तद्वृत्त आगळें ॥ केंवि सोसवे कर्ण भागले ॥ १२५ ॥

## इंद्रवज्रावृत्त.

जाऊनि सांगा मुनिराज कृष्णा ॥सोडूनि दे ही तरुची कुतृष्णा॥
सैन्यादिसाहित्य समग्र योजी॥युद्धासि तो शीघ्र सुखेंचि यो जी२६

## भुजंगप्रयात.

खगारूढ होऊनि येवा गदादी ॥ उगारूनि मारी मला तूंचि आदी ॥
सवें आणि सेना रथी आणि सादी॥ तया ताडितों जो वधूंचाच नादी२७

---

१ दिशाप्रदेशांत. २ आपली स्तुति करणें हें निंदेस कारण आहे. ३ वेळीं. ४ परंतु मजबरावर कपटानें वागतो. ५ विष्णूच्या धनुष्याची दोरी. ६ शंकराचे वरानें. ७ दैत्यानीं. ८ धनुष्याचें टोंकानें तुटलें आहे शिर ज्याचें असा. ९ विष्णु ( ही कथा वेदप्रसिद्ध वाजसनी शाखेचे शतपथनावाचे ब्राह्मण ग्रंथांत सांगीतलेली आहे ). १० ज्या कृष्णानें. ११ मारीन. १२ मजवांचून दुसऱ्याबराबरच्या युद्धांत. १३ विष्णु. १४ कृष्णापराध. १५ कृष्णा चेंवागणें. १६ फाजील. १७ वाईटआशा. १८ तयारकर. १९ येवो. २० गरुडारूढ. २१ स्वार. २२ बायकोचा. २३ नादिष्ट.

### गीति.

जों मी [1]संग्रामजित न न देंचि मंदार सत्य [2]मधुपतिला ॥
जरि न करी [3]बंध्वादर चढवुनि [4]सत्यामुखाब्जमधुप तिला ॥१२८॥
आजचि जाउनि भगवन् कळवी पत्रार्धही तुला हरि तो ॥
हरि तरुचें दे न [6]कदा यदुपा पुरवूनि [8]हेतुला हरि तो ॥ १२९ ॥
[9]मत्प्रीत्यर्थ असें की कळवा जाउनि [10]शौरिच्या [11]सद्मा ॥
[12]छद्मा न करी युद्धीं जेणें कृष्णा हसेल ती [13]पद्मा ॥ १३० ॥

ह० वि० प० अ० ७०

## इंद्राचा युद्धाचा निश्चयपाहून नारदमुनी पुनः वृक्ष देण्याचा अभिप्राय देवून कृष्ण इश्वर आहे असें सुचावितात.

युद्धेछु शक्र पाहुनि एकांतीं त्यास मुनि वदे तेव्हां ॥
व्यर्थ द्रोहा न करुनि परस्परां लागि [14]सुशिवें देते व्हा ॥ १३१॥
जरि मज पुशिलें न त्वां हित शक्रा सांगणें मला प्राप्त ॥
समयीं मित्रहिताहित न बोलतां होय तो कसा आप्त ॥१३२॥
मी जें वदें महेंद्रा तें जरि बरवें असेल तरि घ्यावें ॥
समयीं [15]हितयुत बोलुनि [16]मित्रानृण्यास शीघ्र पावावें ॥ १३३ ॥
[17]अन्योन्यभेद होतां बंधूंचा पावतील [18]अरि [19]मोद ॥
तो [20]मतिमंद ह्मणावा कार्यांतीं होतसे जया [21]तोद ॥ १३४ ॥
या [22]त्वत्कार्याचा मज परिणाम बरा दिसे न [23]देववरा ॥
तरु दे कृष्णाला तूं मज वाटे हाचि बा विचार खरा ॥ १३५ ॥

---

१ युत्धांत पराजय पावलेला. २ कृष्णाला. ३ बंधूचाआदर. ४ सत्य भामेच्या मुखकमलावरचा भ्रमर. ५ सत्यभामेला. ६ कधीं. ७ हे कृष्णा. ८ कारणाला. ९ माझ्या प्रीतीकरितां. १० कृष्णाच्या. ११ घरास १२ कपटा. १३ लक्ष्मी. १४ कल्याण. १५ हितयुक्त. १६ मित्राच्या ऋणमुक्तीस. १७ परस्परांततंटा. १८ शत्रु. १९ आनंद. २० मूर्ख. २१ दुःख. २२ तुझ्या कामाचा. २३ देवश्रेष्ठा.

## कटाव.

इंद्रा तूं रमावराला मानुं नको मनुजां मधला ॥ तुजचि नाक[१] जेणें दिधला[२] ॥ ध्रु०॥ जो हरि आहे जगास पहिला ॥ ज्याणें रचिलें आदी महिलें ॥ जयाची कीं माया महिला[३] ॥ तन्मयवेदीं नाहिं पाहिला ॥ ब्रह्मपळयीं एक राहिला ॥ शेज करूनी निजला अहिलें[४] ॥ उठोनियां मग जों हरि पाहे ॥ जिकडे तिकडे एकचि आहे ॥ मग त्या आदिशक्तिला[५] बाहे[६] ॥ तत्संगें बहु[७] होउनि राहे ॥ शक्रा तूं जाणसी न कां हें ॥ उपासकांच्या कार्या वाहे ॥ सगुण रूप हें आहे अतिशय ॥ वर्णाया तें मजला अविषय ॥ परि तुजला मी कथितों अल्पचि ॥ ज्याचा नाभिर्ज[८] आत्मज[९] जग रचि ॥ तोचि श्रीहरि क्षीरसागरीं ॥ बा ब्रह्मयानें प्रेमभक्तिनें ॥ नमिला स्तविला ॥ मग हरि वदला ॥ मनुष्यलोकीं अवतारा कीं ॥ वसुदेवौकीं[१०] ॥ घेतों टाकीं ॥ दनुजांचें भय ॥ मनुजां निर्भय ॥ करितों हरितों ॥ सदय होउनी ॥ भूभर ऐसें ॥ बोलुनियां मग ॥ घेतसे अवताराला ॥ इंद्रा तूं०॥ ध्रु०॥ घेई तो हरि अवतारातें॥ नंदाचे घरिं नेलें तातें[११] ॥ हरिला पाळी गोव्रजातें[१२] ॥ तेथें गोळीबाळकांतें ॥ मेळवूनियां खेळवि त्यांतें॥ ज्यास नसे कोणाचें नातें ॥ भक्ति असे ज्या त्यास त्रातें[१३] ॥ ज्याचें चरित्र ॥ साचें विचित्र ॥ वाचे पवित्र ॥ करि वणव्याला ॥ जो हरि प्याला बल्लवबाळां[१४] ॥ पल्लवमाळा[१५] ॥ गळां घालि जो सोडवि त्यांलें[१६] ॥ कालिंदीच्या डोहिं बुडाला ॥ पाळिं[१७] उभा तो गोपाळाला[१८] ॥ देखुनि गोपव्रज[१९] बहु भ्याला ॥ देखुनि कृष्णातें शोकाला ॥ आचरती तें पाहुनि व्यालें[२०] ॥ नाच शिरावरि करुनि काढी ॥ त्यास रम-

---

१ स्वर्ग. २ पृथिवीला. ३ स्त्री. ४ शेषाला. ५ मायेला. ६ बोलावी. ७ अनेकरूप. ८ बेंबीपासून जाह्लेला. ९ पुत्र. १० वसुदेवाचेघरीं. ११ वसुदेवानें. १२ गाईच्या समुदायातें. १३ तारणारें. १४ गोपबाळकांना. १५ झाडांचे पाल्याच्या माळा. १६ गोपांच्या मुलांस. १७ यमुनेच्या तीरावर. १८ कृष्णाला. १९ गोपसमुदाय. २० कालिया सर्पाला.

णेकीं द्वीपीं धाडी ॥ इंद्रा ज्याची लीला गाढी ॥ गोवर्धन उपटोनि खोडी ॥ गोवर्धन[3]कर तुझि बहु मोडो ॥ कुकल्पना तरि सत्वर सोडी ॥ अनल्प[4] त्यासी मैत्री जोडी ॥ तोडी संसृतिबंधनबेडी ॥ थोडी जरि तद्भजनीं गोडी ॥ आहे ज्या मानवाला ॥ पाहे हें नाकपाला ॥ इंद्रा तूं ॥२ ॥ मासा कांसव सूकर नरहरि ॥ वामन भार्गवराम राम परि ॥ रामकृष्ण हें एकरूप हरि ॥ जिनसुत कल्की होउनियां धरि अवतार दहा ॥ त्या मूर्ति पहा ॥ फार सुखवंहा[5] ॥ ज्या जननिवंहा[6] ॥ आरव्यांरव[7] हा ॥ सर्वपापहा[8] ॥ हरिचा इंद्रा ॥ जाइल तंद्रा[9] ॥ तुझि मुखचंद्रा ॥ प्रभुच्या पाहुनि ॥ तरि तरु[10] देउनि ॥ गर्वा सोडुनि ॥ कृष्णा नमुनी ॥ प्रसन्न करुनी ॥ यश मेळवुनी ॥ तारि या अमरावतिला[11] ॥ राखि तूं अपुले पतीला[12] ॥ इंद्रा तूं० ॥ ३ ॥ १३५ ॥

## इंद्रवज्रा.

जो एक मायाविकार[13] आहे ॥ तो सर्व पाहे जनभार वाहे ॥
पादाब्जसंलग्न[14] मुनी सदा हे॥ज्याच्या स्तवें पाप नरीं न राहे३६

## भुजंगप्रयात.

महादेव आत्मा जयाचा असे कीं ॥
सुसूक्ष्मस्वरूपें वसे मानसौकीं[15] ॥
स्वभक्ता पडों नेदि जो पापपंकीं[16] ॥
असा कृष्ण ज्याचे रमा[17] नित्य अंकीं[18] ॥ ३७ ॥

## गीति.

अदितिव्रततुष्ट[19]-प्रभु आला कश्यपगृहास छंदानें ॥

---

१ रमणक नावाचे बेटांत. २ दृढ ( प्रौढ ). ३ गाईची वृद्धी करणारा कृष्ण. ४ बहुत. ५ सुखकारक अशा. ६ लोकसमुदायाला. ७ नावाचा-ध्वनि ( म्ह० नामगर्जनेचा शब्द ). ८ सर्व दोष दूर करणारा. ९ प्रमाद ( गैरसावधपणा ). १० पारिजातक. ११ देवलोकाला ( स्वर्गाला ). १२ अमूला. १३ मायेचें मूळ व विकाररहित. १४ पादकमलीं लीन ( नम्र ). १५ मनोमय घरांत. १६ पापमयचिखलांत. १७ लक्ष्मी. १८ मांडीवर. १९ अदितीच्या पयोव्रतानें संतुष्ट जाहलेला विष्णु.

नंदानें तप केलें ह्मणुनि कुलोकांत[1] जाय वरदानें[2] ॥ १३८ ॥
ज्या तूं ह्मणसी भ्राता तो सर्वांचाचि बंधु आहे बा ॥
सर्वजगद्व्यापक तो इंद्रा तूं जाणसी न कां हें बा ॥ १३९ ॥
आमिषपिंड[3] स्नेहें[4] व्याप्त तसा कृष्ण कीं जगद्व्यापी ॥
कर्माधीन[5] न तो तूं तदधीन[6] सुरा[7] न मोहमदिरा[8] पी ॥ १४० ॥
अमरेड्य[9]अग्रभुक्[10]कृष्णा यज्ञीं यागार्ह हा कुसुर[11] वदती ॥
वेदयुगीं[12] बहुरूपें हरि दे भक्तां स्वकीयमोद[13] अंतो[14] ॥ १४१ ॥
नरहरिरूपें जेणें हिरण्यकशिपूस मारिलें नखरें[15] ॥
तो नरकीं पडतो कीं नरहरिचरितास मानि जो न खरें ॥१४२॥
तो हरि वामनरूपें बळिला बांधी स्वनागपाशानें ॥
सुतलीं[16] भाविसुखास्तव[17] सुतलीं[18] दैत्योशि[19] नाकपाशा[20] ने ॥१४३ ॥
सुरदितिजोत्पादित[21] जरि [22]जेणें [23]श्री तों तुलाच बा दिधली ॥
त्वत्कार्यार्थ[24] प्रभु तो मारी दानव[25] बळें सुराधि[26] दली[27] ॥ १४४॥
रामत्वें रावण वधि सोडवि भार्या[28] बळेंकरुनि निजा[29] ॥
देखें दितिजबलीं मी कृष्णाला जेंवि पावका[30] वनजा[31] ॥ १४५ ॥
ऐसा कृष्ण प्रभु तो इंद्रा नेईल निश्चयें तरुतें ॥
त्वद्दानें[32] तरि हरि तो यश [33]लोकीं वृक्ष नेउनी करु तें ॥ १४६॥
हें सत्य वदतसें मी भ्रातृस्नेहें न मारवेल तुला ॥
हरितें हरिही तुजशीं ज्येष्ठत्वास्तव[34] न तो करिल तुमुला[35] ॥१४७॥

---

१ भूलोकांत. २ वरदानामुळें. ३ मांसपिंड ४ तेलानें. ५ कर्मांचे स्वाधीन. ६ कर्मांचेस्वाधीन. ७ हे इंद्रा. ८ मोह हेंच मद्य. ९ देवांनापूज्य अशा कृष्णाला. १० यज्ञांत अग्रपूजेस योग्य. ११ ब्राह्मण. १२ चारीयुगांत. १३ आत्मसुखप्रेम. १४ पुष्कळ. १५ नखांनीं. १६ सुतल नावाच्या पातालांत. १७ होणारेसुखास्तव. १८ चांगलें आहे तल ज्याचें हें, पातालाचें विशेषण करावें. १९ बळीस. २० इंद्र व्हावें ही आशा. २१ देवदैत्यांनीं उत्पन्न केलेली. २२ कृष्णानें. २३ संपत्ती. २४ तुझ्या कामाकरितां २५ दैत्य. २६ देवद्रोहक. २७ सेनापती. २८ सीता. २९ आपली. ३० अग्नीला. ३१ वनांत उत्पन्न झालेल्या वणव्यास. ३२ त्वां दिल्यामुळें. ३३ मनुष्यलोकांत ३४ वडीलपणामुळें. ३५ तुंबळ.

जरि मद्वचन महेंद्रा वाटेल खरें न जे तुझे मंत्री[1] ॥
त्यांस पुसावें मी तों वाजवितों नित्य ही सुखें तंत्री[2] ॥ १४८ ॥

## नारदाचा वृक्ष देण्याचा अभिप्राय जाणूनही इंद्र वृक्ष न देण्याचेंच बोलतो.

हें नारदोक्तें[3] परिसुनि महेंद्र[4] बोले मुनीश्वरालागी ॥
या गीसें[5] जाणतों त्यां[6] कळवा जो बायकांत अनुरागी[7] ॥१४९॥
ऐसा जरि कृष्ण असे तरु त्याला तरि कदां[8] न देईन ॥
दीपज्योति[9] नुजळिली ह्मणूनि कोपा चढे न नलिनीन[10] ॥ १५० ॥
जे थोर वृध्दवाक्यश्रवणानें[11] ते सहिष्णु[12] असतात ॥
अल्पार्थ[13] कोप न करिल हरि मज त्या मानणें असे तात[14] ॥१५१
मानी मन्मातेला[15] मानू तद्वत्[16] तिच्या सुताला[17] ही ॥
वृक्षादानजकोपें[18] अनुजांगाची न हो मुने लाही ॥ १५२ ॥
कृष्ण भागवतारीं[19] कां तेव्हां जाहला न तो ज्येष्ठ ॥
आतां जरि इच्छितसे कीं होवो तो सुखें हरी श्रेष्ठ ॥ १५३ ॥

## मग नारदमुनी द्वारकेंत जाऊन इंद्राकडील वर्तमान कृष्णास कळवून, कृष्णाचा युद्धास जाण्याचा निश्चय पुनः स्वर्गी जाऊन इंद्रास कळवितात.

जाणुनि महेंद्रनिश्चय शक्राज्ञेनें निघे मुनीश्वर[20] तो ॥
ज्याच्या विनोदलहरी[21]-मध्यें हें सर्वदैव विश्व रतो ॥ १५४ ॥

ह० वि० प० अ० ७१

---

१ प्रधान. २ तार ( उपलक्षणानें वीणा ). ३ नारदानें सांगीतलेलें. ४ इंद्र. ५ वाणीस. ६ कृष्णाला. ७ प्रेमकरणारा. ८ कधीं देणार नाहीं. ९ दिव्याची ज्योत. १० सूर्य. ११ थोराचें वचन ऐकून. १२ सहनशील. १३ थोडक्याकरितां. १४ बाप ( म्हणजे मी वडील भाऊ असल्यामुळें मला त्यास बापाप्रमाणें वडिलपणाचा मान दिला पाहिजे हें तात्पर्य ). १५ माझ्या आईला. १६ त्याप्रमाणें. १७ मुलाला. १८ झाड न दिल्यामुळें आलेल्या रागानें. १९ मागच्या ( वामनावतारीं ). २० नारद. २१ नारदाच्या वाक्यरचनचातुर्यविलासमयलहरींत.

द्वारवतींत मुनी तो ये तों प्रभु मंदिरीं सुखासीन[1] ॥
देखुनि जें सुख घे तें विरिंचिलोकीं[2] चतुर्मुखासी[3] न ॥ १५५ ॥
तवर्थ[4] लक्षुनि मनीं सत्ये लागीं विनोदवित आहे ॥
हरि तों शक्रगृहाहुनि आला मुनि त्यास अंबरीं[5] पाहे ॥ १५६ ॥
मुनिला पूजुनि पुसता झाला वृत्तांत[6] कृष्ण इंद्राचा ॥
न तरुस दे हें जाणे वर्ण विलोकूंनि[7] वक्रचंद्राचा[8] ॥ १५७ ॥
मग नारदोक्त परिसुनि उपेंद्र[9] मुनितें वदे गमन करितों ॥
अमरावतींत[10] मत्सं-देशा[11] कळवूनि जागवो हरि तो ॥ १५८ ॥
एकांतीं कृष्ण वदे मुनितें कळवा असा समाचार ॥
शक्रा तरु नेइनची करिशी युद्धा जरी समा[12] चार ॥ १५९ ॥
मुनि हरिसंदेशें[13] असा शक्रातें जाउनी वदे नाकीं[14] ॥
हरि येतो युद्धातें अजून तरि तूं तरुस देना कीं ॥ १६० ॥

**इंद्राचें व कृष्णाचें युद्ध होणार हें बृहस्पतीस समजतांच इंद्राचा अविचार वर्णून बृहस्पती तें वर्तमान कश्यपास कळवितात.**

त्या वृत्ता[15] सुरपति[16] मग कळवी गुरुजीस गुरु वदे त्यास ॥
दैत्यांस[17] जीव जगवी कोण बरें ह्या वदे न कृत्यास ॥ १६१ ॥
हरि[18] टाकुनि तरु घेणें सुचलें हें कृत्य हो[19] बुधा[20] कां जी ॥
हें वाटे मज जेवीं घे बाल त्यजुनिया दुधा कांजी[21] ॥ १६२ ॥
सहसारंभितें-कार्या-पासुन[22] येइल लघुत्व[23] लेखपते[24] ॥
चुकतें भावि[25] महेंद्रा तरि देवादिकहि कां भले खपते[26] ॥ १६३ ॥

---

१ उत्तम आसनावर बसलेला. २ सत्यलोकीं. ३ ब्रह्मदेवाला. ४ पारिजात केव्हां मिळेल हा अभिप्राय. ५ आकाशांत. ६ समाचार. ७ पाहून. ८ मुखचंद्राचा. ९ कृष्ण. १० इंद्रलोकामध्यें. ११ माझ्या निरोपाला. १२ वर्षें (म्हणजे चारवर्षें युध्द केलेंस तरी वृक्ष नेल्यावांचून राहणार नाहीं हें तात्पर्य ). १३ कृष्णाचा निरोप. १४ स्वर्गीं. १५ वर्तमानाला. १६ इंद्र. १७ देणारास. १८ कृष्ण. १९ हें दुःखार्थीअव्यय. २० वेडया. २१ पेज. २२ अविचारानें आरंभलेल्या कामापासून. २३ हलकेपणा. २४ हे इंद्रा. २५होणारें. २६ मरते.

## साकी.

कालज्ञाता[1] वाचस्पति[2] मग झाला चिंताक्रांत ॥
खालीं घाली वदन चिंति जो व्हावा कलह सुशांत[3] ॥ १६४ ॥

## गीति.

ऐसें बोलुनि जाउनि मारीचा कळवि तो गुरु उदंत[4] ॥
केलं त्वदात्मजानें पडण्याचें कार्य हो सुरू दंत ॥ १६५ ॥
तें श्रुत होतां कश्यप भाव्य[5] ह्मणे तें दिवस्पतिस[6] सर्व ॥
कृष्णा कदा नाटोपे युद्धीं गेला जरी हरि ससर्व[7] ॥ १६६ ॥
भार्याधर्षणकोपें[8] गौतमवाक्यें महेंद्र हा शप्त[9] ॥
भोगिल तें पाप मला झाला उदवास[10] यन्निमित्तां[11] ॥ १६७ ॥
युद्धा मध्यें जाउनि सादिति[12] मी त्यां[13] गुरो निवारीन ॥
मन्मर्यादावेला[14] नोल्लंघी[15] उभयकोपवारीन[16] ॥ १६८ ॥
धिषण[17] वदे मारीचा[18] समरीं[19] ये शीघ्र कीं नसे अवधी[20] ॥
कृष्णा इंद्र उपेंद्रहि शक्राला जों शरव्रजें[21] न वधी ॥ १६९ ॥
समरीं कश्यप येतों ऐसें वदतांचि गुरु गृहा आला ॥
कश्यप कुटुंबकलिमल[22]-नाशास्तव तो स्तवी महेशाला[23] ॥ १७० ॥

## उपेंद्रवज्रा.

नमी तया सांबसदाशिवातें ॥ न मी तशा कीं करितों स्तवातें ॥
सुरांशि दे श्रीदसखा[24] शिवातें ॥ जया हरा[25]तें नमिते शिवा[26] ते ॥ १७१ ॥

---

१ समय जाणणारा. २ बृहस्पति. ३ थंड. ४ वर्तमान. ५ होणार. ६ इंद्रास. ७ शंकरा सहवर्तमान. ८ बायकोला धरली त्या रागानें. ९ शापलेला. १० तपाकरितां उदकवास. ११ इंद्राकरितां मला प्राप्त झालेला. १२ अदितिनावाच्या स्त्रियेसह. १३ इंद्र व कृष्णाला. १४ माझी मर्यादा हीच रेषा. १५ नाहीं उल्लंघिणार. १६ उभयतांचा कोपसमुद्र. १७ बृहस्पति. १८ हे कश्यपा. १९ युद्धांत. २० अवकाश. २१ बाणसमुदायानें. २२ कुटुंबांतील कलह मिटावा ह्मणून. २३ शंकराला. २४ कुबेरसखा. २५ शंकरानें. २६ पार्वती.

## इंद्रवज्रावृत्त.

ऐकूनि यन्नाममृगेंद्रवातें[1] ॥ पापस्वरूपों[2] पळती शिवा[3] ते ॥
जो भक्तितोषें पळवी भवा[4]तें॥त्यातें नमी मी सुखदाभवातें[5]॥७२॥
कल्पांतकाळीं[6] हर विश्व जाळी ॥मद्दुःखसंदोह[7] कसा न टाळी॥
त्वन्नामसंकीर्तनजात[8] टाळी[9] ॥संपूर्णपापास सदा पिटाळी[10]॥१७३॥

## साक्या.

शंकरभजनीं रत होतो ॥ नर देवानीं नुत हो तो ॥ ध्रु० ॥
मारीचानें ऐसें स्तवितां वरद शंभु तो त्याला ॥
सगण[11] सशक्तिक[12] येउनि भेटे प्रेमानें स्तोत्याला ॥ १७४ ॥
बोले वरवच मुनितें शंकर जास्तव माझ्या स्तोत्रा ॥
केलें त्याचें कारण जाणुनि आलों विधिच्या पौत्रा ॥ १७५ ॥
दोघे त्वत्सुत[13] मर्कतिस[14] येतिल तरुतें नेइल विष्णु ॥
गौतमवाक्यें[15] वरिल लघुत्वा शक्र असे जरि जिष्णु[16] ॥ १७६ ॥

## गीति.

मारीचा भार्येसह जावें अमरावतीस[17] अनवरत[18] ॥
होइल सख्य सुतांचें तुझिया आहेत तेचि अनव-रत[19] ॥ १७७ ॥
परिसुनि हरवचन असें कश्यप नाकीं ग्रहेशभ[20] वनाशी[21] ॥
गेला प्रभु कैलासीं आशी[22] देउनि महेश[23] भवनाश[24] ॥ १७८ ॥

ह० वि० प० अ० ७२

---

१ ज्या शंकराच्या नामरूपी सिंहशब्दातें. २ पापरूपी. ३ भालु. ४ जन्ममरणफेऱ्यास. ५ सुखदायकशंकरातें. ६ प्रलयकाळीं. ७ माझ्या दुःखाचा समुदाय. ८ तुझ्या नामकीर्तनांत वाजविलेली. ९ ताल. १० हांकी. ११ गणांसह. १२ पार्वतीसह. १३ तुझे मुलगे. १४ ताळयास. १५ गौतमऋषीच्या शापानें. १६ सर्वदा जय मिळविणारा. १७ इंद्रनगरास. १८ नित्य. १९ पुरातन प्रेमयुक्त. २० सूर्यवत् तेजस्वी. २१ तपामुळें वन म्ह० उदक हेंच खाणें पिणें ज्याचें असा कश्यप. २२ आशीर्वाद. २३ रुद्र. २४ जन्म मरण दूर करणारा.

## कृष्ण मदनादिकांस घेऊन युद्धास जातात.

### साक्या.

गा नर कृष्णचरित्रातें ॥ तारक सुखद विचित्रातें ॥ ध्रु० ॥
प्रातःकाळीं सात्यकि मदनासह हरि गरुडारूढ ॥
गेला रैवतपर्वतावरी जो नररूपें गूढ ॥ १७९ ॥
करुनि निमित्ता मृगयेच्या कीं रथहि असे सह[3]चार ॥
सहाय असती परस्परांतें ते गरुडासह [4]चार ॥ १८० ॥
कृष्ण वदे दारुका राहावें दिनार्ध येथें त्वां कीं ॥
रथासहित म्यां स्मरतां यावें द्रुत मी जातों नाकीं ॥ ८१ ॥

### गीति.

सात्यकि-युत हरि विजयो-द्यत होउनि करि सु-खगवरारोह ॥
गेला स्वर्गीं निमिषें मागुनि तो जाय रतिवरारोह ॥ ८२ ॥

### नंदनवनांत जाऊन कृष्णानीं वृक्ष उपटिला.

नंदनवनांत जाउनि उपटी तत्काल पारिजाता ने ॥
गरुडावरी हरि वदे केला हा तरु मदीयतातानें ॥ ८३ ॥

### कृष्ण वृक्षास अभय देऊन इंद्रनगरास प्रदक्षिणा करितात.

तरु भयभीत विलोकुनि बोले अभयीं द्रुमेश्वराली गी ॥
करि हरि पुरप्रदक्षिण ज्यांत वसे तो पुलोम[13]जारागी ॥ ८४ ॥

### इंद्रादिकही युद्धास येतात.

रश्मि[14]मुखें कळतां तें वृत्त गजेंद्रावरी चढे हरि तों ॥
हरितो [16]हरि [18]अनयें तरु शक्र वदे त्यास शिक्ष[19]णों करितों ॥ ८५ ॥

---

१ गुप्त. २ शिकारीच्या. ३ बरोबर असणारा. ४ संख्यावाचक शब्द. ५ लौकर. ६ जय मिळविण्याविषयीं तयार. ७ शोभायमान गरुडावर आरोहण. ८ मदन. ९ माझ्या बापानें १० निर्भय. ११ पारिजातकाला. १२ वाणी. १३ शचीवर प्रीति करणारा इंद्र. १४ रश्मिवाल दारांच्या मुखानें. १५ ऐरावतावर. १६ इंद्र. १७ कृष्ण. १८ अन्यायें करून. १९ शिक्षेतें.

पृष्ठीं रथस्थ-पुत्रासह मघवा[1] येत तों हरिस पाहे ॥
पूर्वद्वारीं देखुनि बोले तुज योग्य काय मधुपा[2] हें ॥ १८६ ॥

**कृष्णानीं इंद्रास नमून वृक्ष नेण्याचें कारण सांगीतलें.**

गरुडस्थकृष्ण नमुनी शक्रास वदे वधूव्रता करितां ॥
नेतों तरि विघ्न करुनी हैर्यग्रीं[3] तूं नको वरूं करितां[4] ॥ १८७ ॥

**इंद्रानें, मला जिकल्यावांचून वृक्ष नेऊंनये असें श्रीकृष्णास सांगीतलें.**

कृष्णातें शक्र वदे मज जित केल्याविना तरुस न्याया ॥
योग्य न तूं तरि मजला प्रहार करिं बा करीं न अन्याया ॥१८८॥

**मग युद्धास आरंभ होतो.**

प्रथमारंभीं कृष्णें तीक्ष्णशरें ताडिलें गजाला हो ॥
शक्र खगातें[5] ताडी कीं जेणें अधिक तो व्यथा लाहो ॥१८९॥
तोडिति परस्परशरां इंद्ररवें[6] आणि शार्ङ्गनादानें ॥
अस्वास्थ्यें[7] सुर[8] वदती सोडवि या संकटीं रमाजाने[9] ॥ १९० ॥
इतक्यांत खगस्थ-द्रुम-हरणोद्यतशक्रसूनुतें[10] वारी ॥
प्रद्युम्न[11] जसें दावानलतेजा[12] काननीं[13] जलदवारी[14] ॥ १९१ ॥
दोघे रथस्थ हरिसुत[15] परस्परां हाणिती स्वबाणांनीं ॥
करिती सिंहरवातें ज्याशब्दें होय बधिरता[16] कानीं ॥ १९२ ॥
तंव तो प्रवर[17] शचीपति-दूत निघे द्विजग-तरु[18] हरायाला ॥
द्विज[19] बहु-बुभुक्षित जसा सदन्न[20] देखुनि वदे हरा याला॥१९३॥
ब्रह्मवरें इंद्रसखा झाला तो मान्य देवराजीस[21] ॥

---

१ इंद्र. २ मधुनामक यादवांच्या पते हे कृष्णा किंवा हे मद्यप्या ३ सिंव्हापुढें ४ हत्तीपणा. ५ गरुडातें. ६ इंद्राच्या शब्दानें. ७ काळजीनें. ८ देव. ९ हे रमापते. १० गरुडावर ठेवलेला पारिजात हरण करण्यास तयार जो इंद्रपुत्र जयंत त्यातें. ११ मदन. १२ वणव्याच्या तेजास. १३ वनांत. १४ मेघोदक. १५ मदन व जयंत. १६ बहिरेपणा. १७ प्रवर या नावाचा ब्राह्मण. १८ गरुडावर असलेला वृक्ष. १९ ब्राह्मण. २० चांगलें अन्न. २१ देवपंक्तीस.

कृष्ण वदे सात्यकिला निर्दय मारूं नकोच भटजीस ॥ १९४ ॥
मग षष्टिशरीं[1] प्रवरें सात्यकिला हाणिलें स्वतेजानें ॥
परि नग[2] तृण जेविं गणी न तसे गणिले पृषत्कं[3] शिनिजानें[4]॥१९५॥
शैनेयें[5] द्विजधनु[6] तें तोडुनि हासुनि ह्मणे अहो भटजी ॥
न वदति कोणाला हे भट्टां[7]नांमात्र हे यदुर्ज-भट[8] जी ॥ १९६ ॥
प्रवर वदे हासुनि मग शांती मजशी धरूं नको शिनिजा[9] ॥
त्याचा शिष्य असें मी ह्मणती कीं काळ सत्य दोर्जनि[10] जा॥१९७
ऐसें वदोनि दोघे करिती संग्राम थोर बहुदंरंद[11] ॥
रदें[12] आणि ओष्ठ चावुनि जेविं वनीं मत्त भासती द्विरदें[13] ॥१९८॥

**दिंडी.**

द्वंद्वयुद्धातें करिति ते उदंड ॥ मुखें जल्पति ठोकिती भुजादंड ॥
सहा योद्धे भासती रणीं चंड[14] ॥ एकमेकांचे करिति बाणखंड॥१९९॥
असा मोठा संग्राम विलोकूनीं ॥ देव दचकोनी कांपती विमानीं ॥
शंकरातें आणिती मनीं ध्यानीं ॥ नाम वाचेनें घेति ते भयानीं ॥२००॥

**गीति.**

मग त्या युद्धविमर्दीं[15] ताडी शैनेयत्द्दत्[16] तदा प्रवर ॥
मूर्छित शक्तीनें तो[17] तों पाहे तरु हरुं सुविप्रवर ॥ २०१ ॥
मूर्छित सात्यकि पाहुनि तार्क्ष्यांशी[18] ये तदा मुनि द्रुहरू[19] ॥
त्या पक्षें क्रोशद्वय[20] उडवि जसा वातें[21] भूरजांसह[22] रू[23] ॥ २०२ ॥
मग खगनगभिद्वाह[24]-द्वंद्वाचें युद्ध लागलें सुरस ॥
ज्याच्या विलोकनानें [25]भीरूंचे म्लान वक्त्रतामरस[26] ॥ २०३ ॥

---

१ साठ बाणांनीं. २ पर्वत. ३ बाण. ४ सात्यकीनें. ५ सात्यकी. ६ प्रवरनामक ब्राह्मणाचें धनुष्य. ७ वेदशास्त्र सदाचार संपन्न ब्राह्मणांस. ८ यदुकुलोत्पन्न वीर. ९ हे सात्यकीरे. १० क्षत्रिय. ११ बहुभयप्रद. १२ दांत. १३ हत्ती. १४ अत्यंत कोपायमान. १५ युद्धाचे तडाक्यांत. १६ सात्यकीचें उर. १७ सात्यकी. १८ गरुडाजवळ. १९ वृक्ष हरणकरणारा. २० दोनकोस. २१ वारा. २२ पृथ्वीवरचेधुळीसह. २३ विंचरलेला कापूस. २४ खग ह्म० गरुड व नगभिद्वाह ह्म० ऐरावत या उभयतांचें. २५ भित्र्यांचें. २६ मुखकमल.

## दोनघटका युध्द झाल्यावर ऐरावत, पारियात्रपर्वतावर पडतो.

नाडीद्वय युद्धकरुनि गज खगपक्षाहत प्रपातातें ॥
पावे पतन तयाचें दे कंप अकंपपारियात्रातें ॥ २०४ ॥

## पुनः ऐरावत सावध झाल्यावर तेथेंच इंद्र व कृष्ण युध्द करितात.

### वृत्तशिखरिणी.

जरी दंती पावे पतन तरि वज्री नच कदा ॥
तया सोडी स्नेहें वहन करितो ज्यासचि सदा ॥
जया मार्गे धांवे सतरुर्युतपक्षीश्वर गदा ॥
करांब्जीं शोभे त्या स्मरुनि दवडीरे नर गदा ॥ २०५ ॥

### उपेंद्रवज्रा.

पुनः सुयुद्धा करितो हरी ते ॥ रिते जयांचे न कधींहि भाते ॥
बळेंचि ते ताडिति एककातें ॥ जगास जे तारिति इष्टदाते ॥२०६॥

### गीति.

मग वज्रायुध वज्राप्रति मारी तार्क्ष्यमस्तकीं मघवा ॥
अघवा न तो ह्मणोनी साहे वाहेचि लोकमातृधवा ॥ २०७ ॥
तार्क्ष्याक्रमणें गिरि तो शिरला धरणींत कृष्ण नग सोडी ॥
दवडी तार्क्ष्या न प्रभु शिशिरांत हिमार्त जेविं पासोडी ॥२०८॥

---

१ दोनघटका. २ गरुडाचे पंखानें ताडलेला. ३ पतनातें. ४ पडणें. ५ अचल जो पारियात्रपर्वत त्यातें. ६ हत्ती. ७ इंद्र. ८ वर पारिजात असलेल्या गरुडासहित कृष्ण. ९ हस्तकमलामध्यें. १० रोगाला. ११ वज्रधारण करणारा. १२ गरुडाचे डोक्यावर. १३ इंद्र. १४ पापी. १५ श्रीकृष्णाला. १६ गरुडाचे पादप्रहारानें. १७ जमिनींत. १८ पर्वत. १९ थंडीचे दिवसांत. २० हिवानें पीडित.

## कृष्णाज्ञेनें दारुक रथ आणतो.

कृष्ण वदे मदनाप्रति जा द्वारवतींत शीघ्र रथ येवो ॥
मदनोक्तिश्रुत-दारुक[1] हरिला दे तों क्रमूनि पथें[2] ये वो ॥२०९॥

ह० वि० प० अ० ७३

## कृष्ण रथांत बसतांच, पर्वत, रथास मार्ग देतो.

त्या स्यंदनांत[3] बैसुनि जेथें ऐरावतस्थ इंद्र वसे ॥
तेथें युद्धा ये हरि त्या देखुनि पारियात्र भूतें[4] बसे ॥ २१० ॥
झाला शाणोंघ्रिप्रभ[5] नग[6] कृष्णसुखार्थ हरिबलाभिज्ञ[7] ॥
युद्धीं हरिमागें खग जैसा वेदानुग[8] प्रमुदयज्ञ[9] ॥ २११ ॥

## सायंकाळ जाहल्यावर उभयतां रात्रीस युद्ध आटोपतात.

गरुडस्थ काम सात्यकि झाले तरुरक्षक क्षपा[10] आली ॥
झाली संध्यावेला बोले अमराधिपास वनमाली[11] ॥ २१२ ॥
थकला त्वद्द्विज[12] गरुडाहत[13] आली घोरही पुढें रजनी[14] ॥
शक्रा तरि करि युद्धा श्वः[15] पावावें महत्व शूरजनीं[16] ॥ २१३ ॥
शक्रें तथास्तु बोलुनि करूनि गिरिदुर्ग[17] पुष्कराभ्याशीं[18] ॥
राहे विष्ण्वग्रीं[19] जय केंवि मिळे जरि सुदुष्कराभ्यासो[20] ॥२१४॥
आले ब्रह्मादिकसुर तेथ श्रीकृष्ण पारियात्रनगीं[21] ॥
राहे सात्यकिमदनां-सह ज्यांची सुप्रसन्न आननें[22] [2]गी[23] ॥२१५ ॥

---

१ मदनाचें वचन ऐकलेला दारुक ( कृष्णाचा सारथी. ) २ मार्ग. ३ रथांत. ४ जमिनींत. ५ साहणेच्या खुरा सारखा. ६ पर्वत. ७ कृष्णाचे सामर्थ्य ओळखणारा. ८ वेदानें दाखविलेल्या मार्गानें जाणारा. ९ आनंदयुक्त यज्ञ. १० रात्र. ११ कृष्ण. १२ तुझा हत्ती. १३ गरुडानें ताडलेला. १४ रात्र. १५ उद्यां. १६ वीरांमध्यें. १७ पर्वताचा कोट. १८ पुष्करनामक क्षेत्राजवळ. १९ विष्णुपुढें. २० अतिदुर्घट अभ्यास केलेला. २१ पारियात्रनामक पर्वताचेठायीं. २२ मुख. २३ वाणी.

## रथाला मार्ग देणाऱ्या पर्वतास कृष्ण वरदान देतात.

जेणें रथमार्ग दिला त्या गिरिला वर वदे यदुश्रेष्ठ ॥
ज्येष्ठत्व[1] सर्वशैलीं[2] तुज येइल तूं मला बहुप्रेष्ठ[3] ॥ २१७ ॥

## श्रीकृष्ण रात्रीस जय मिळण्याकरितां शंकराचें आराधन करितात.

### इंद्रवज्रा.

गंगा तदैव स्मरतां हरीनें ॥ ये शीघ्र जी पापभया हरी ने ॥
जीतें दिलीपोत्थ[4] सुखें नदीनें[5] ॥ स्वीकारिलें तीस वरा मुखानें ॥२१८॥

### शालिनी.

त्या गंगेत स्नात तो चक्रपाणी[6] ॥ घे बिल्वांतें[7] हस्तकीं आणि पाणी ॥
तत्कालीं तो शंभुला तेथ आणी॥उच्चारी त्या शंकरा ज्याचि वाणी२१९

### गीति.

गंगोदकबिल्वस्था[8] प्रभु पूजी पारिजातसुमनानें[9] ॥
नमनें हरचरणीं मन अन्यत्र द्वारकेश न मना नें ॥ २२० ॥

### स्वागतावृत्त.

हस्त जोडुनि वदे हरि शंभो ॥ मन्मनोभिलषितं[10] कुरु शंभो ॥
देय एव शंकरः[11] परिरंभ स्त्वा ऋते मम न[12] कोपि सुरभों॥२२१॥

## शंकर प्रसन्न होऊन कृष्णास वरदान देतात.

### गीति.

एवंस्तुत[13]-रुद्र वदे दक्षिणहस्त प्रसारुनीं हर्षें ॥

---

१ थोरपण. २ सर्व पर्वतांत. ३ फार प्रिय. ४ भगीरथ. ५ नद्यांचा इन ह्म० स्वामी समुद्र त्यानें. ६ कृष्ण. ७ बेलपत्रातें. ८ गंगोदक व बिल्वपत्रांनीं युक्त अशा शंकरातें. ९ पारिजातकपुष्पानें. १० हे शंकरा माझें मनांतील इच्छा पूर्ण कर ११ सुखकारक आलिंगन मला द्यावेंच. १२ हे देवश्रेष्ठा तुजवांचून माझा सहायकर्ता कोणीही नाहीं. १३ ऐसा स्तविलेला शंकर.

श्रीकृष्णमनोरथवन[1] शिपी वरदर्षभेष्ट[2] वरवर्षें[3] ॥ २२२ ॥
तूं पारिजात नेशिल मज कांहीं बा अदेय[4] वरदा[5] न ॥
हरि आशीर्वच तें घे जैसा सत्पात्रविप्रवर[6] दान ॥ २२३ ॥
मी जें वदलों कीं तूं होशील अवध्य[7] सत्य[8] न असत्यें[9] ॥
नाँ[10] सत्य वदे त्याच्या भवरोगां[11] तूं सुकृत्यें[12] नासत्यें[13] ॥ २२४
बिल्वोदकेश्वराभिध[14] होइन विख्यात कीं त्वदर्चित[15] मी ॥
मोक्षा पावे तो नर मज येउन येथ तीन अर्चि तमी[16] ॥ २२५ ॥

## शंकर श्रीकृष्णास पारियात्रपर्वतावर लपून असणाऱ्यां दैत्यांस मारण्याची आज्ञा देतात.

एतत्पर्वतविवरीं[17] वसती दानव बलिष्ठ वरदानें ॥
देवां अवध्य त्यांतें मृत्युगृहीं[18] भक्तकार्यकरदा[19] ने ॥ २२६ ॥
अंतर्हित[20] शिव होतां कृष्ण वदे पर्वता तुझें विवरें[21] ॥

## शंकर गुप्त जाहल्यावर श्रीकृष्ण पुनः पर्वतास वर देतात.

झांकुनि दैत्यां वधितों माग तुझा काय तो यथेष्ट वर ॥२२७॥
हरि झाकुन षट्पुर[22] ते नगास[23] वर दे असेन सन्निहितें[24] ॥
त्वच्छिखरीं[25] येउनि घे मद्दर्शन त्यास मी प्रसन्न हितें[26] ॥ २२८ ॥
त्वत्पाषाणप्रतिमारूपें[27] मज पूजि त्यास नाकगती[28] ॥
पूजिति तदश्ममूर्ती[29] हरिची तत्प्रभृति[30] मर्त्यलोकग[31] ती ॥ २२९ ॥

ह० वि० प० अ० ७४

---

१ श्रीकृष्णाचें मनोरथ हेंच कोणी वन. २ वर देणाऱ्यांत श्रेष्ठ जे त्यांना जो प्रिय शंकर. ३ वरदानरूप पर्जन्यानें. ४ न देण्यांस योग्य. ५ वर देणाऱ्याला. ६ सत्पात्रब्राह्मण. ७ नाश न पावणारा. ८ खचित. ९ खोटें. १० मनुष्य. ११ संसाररोगास. १२ चांगली चिकित्सा जाणणारा. १३ अश्विनीकुमार. १४ या नावाचा. १५ त्वां पूजिलेला. १६ रात्री. १७ यापर्वताचे बिळांत. १८ यमलोकीं. १९ भक्तांचे कामास हात देणाऱ्या कृष्णा. २० गुप्त. २१ बिळ. २२ यानावाचे दैत्य. २३ पर्वतास. २४ जवळ. २५ तुझे मस्तकावर. २६ कल्याणदायक. २७ तुझ्या दगडाच्या मूर्ती करून त्या स्वरूपानें. २८ स्वर्गप्राप्ती. २९ त्या पाषाणाची मूर्ति. ३० त्या दिवसापासून. ३१ मनुष्यलोकांतले जन.

## दुसरे दिवशीं सकाळीं पुनः इंद्र व कृष्ण युद्धास लागतात.

दुसरे दिनीं सकाळीं बिल्वदलेश्वर नमूनि हरि मारी ॥
हाक महेंद्रा प्रभु तो ज्याच्या अंकीं[1] लसत्करीं[2] मा[3]ऽ-री[4] ॥२३०॥
ऐकुनि समरामंत्रण[5] शक्र चढे स्यंदनीं[6] जयंतसह ॥
मग ते रथस्थहरि[7] बहुसंग्रामा करिति त्यांस तो सुसह[8] ॥२३१॥
हर्यश्वां[9] ताडी हरि[10] दिग्बाणीं[11] हरि[12] बलाहकांतांस[13] ॥
कीं भासे करिती हे विश्वाच्या[14] प्रलयमेघ अंतास[15] ॥२३२॥

### साक्या.

वीर्यें हरिचीं ऐकावीं ॥ संसृतिदुःखें ओकावीं ॥ धु० ॥
मर्में काढुनि परस्परांचीं बाणांच्या आसारा[16] ॥
वर्षुनि गर्जति भरिती हरि ते समरांगणकासारा[17] ॥ १ ॥
असि[18]-शक्ति-गदा-परिघ-मुद्गरादिक-शस्त्रांचा मार ॥
करिति बरा परि कोणि न घेती युद्धामध्यें हार ॥ २ ॥
बाणजालमय-गगन जाहलें आतपत्रसें[19] भासे ॥
भूचर-दिविचरें[20]-खचर-जीवगण देखुनि युद्धा त्रासे ॥ ३ ॥
शस्त्रयुद्ध बहुकरुनि दाविती अस्त्रांच्या रणरंगा ॥
कोण ह्मणे त्यां विषहि भक्षितां पावति ऐसें भंगा[21] ॥ ४ ॥

---

१ मांडीवर. २ सुशोभित हातांत. ३ लक्ष्मी. ४ चक्र. ५ युद्धाची हांक. ६ रथांत. ७ रथांत बसलेले कृष्ण व इंद्र. ८ सुसाध्य. ९ इंद्राचे घोड्यांस. १० कृष्ण. ११ दाहाबाणांनी १२ इंद्र. १३ कृष्णाच्या रथांचे घोड्यांची नावें शैब्य, सुग्रीव, मेघपुष्प, आणि चवथा बलाहक, या चौघांत बलाहाक आहे शेवटीं ज्यांत अशा चारी घोड्यांस. १४ जगाच्या. १५ संहारास. १६ अखंड पर्जन्य वृष्टीला. १७ युद्धभूमी हेंच कोणी एक तळें त्यातें. १८ तरवार. १९ छत्र. २० भूमीवरचा, स्वर्गींचा, अंतरिक्षांतला, जो जीव समुदाय तो. २१ नाशा.

अग्न्यस्त्रावरि पर्जन्यास्त्रा सोडिति त्यावरि वाते[१] ॥
हात खळेना हरिशक्रांचा एकहि नाहिं निवांत ॥ ५ ॥
हरींद्रयुद्धें प्रलय मांडला तीनहि भुवनप्रांतीं ॥
क्रांती वाटे सत्यलोकपति-विधिही[३] दचके स्वांतीं ॥ ६ ॥

## गीति.

इंद्रगजाला दशशत[४]बाणीं हरि करुनि सिंहरव[५] हाणी ॥
लागे करि[६]अंगांतुनि रुधिरांची[७] थोर सत्वर वहाणी[८] ॥ २३४ ॥
उत्फुल्ल[९]किंशुक वनीं जेंवि दिसे वर्ण तो हरिगजाला[१०] ॥
परि शक्र करी स्पर्शें निर्व्रण[११] तत्काल छिन्नगं[१२] जाला[१३] ॥ २३५ ॥

## इंद्र व कृष्णाचें युत्ध आवरेना ह्मणून महाभयंकर उत्पात होतात.

त्या घोरसमरसमयीं दिग्दाह[१४] कुकंप[१५] थोर गिरिशिखरें[१६] ॥
पडती भूवरि सुचविति अपयश येतेंचि आज हरिशि खरें २३६
आकाशीं ग्रहयुद्धें सुटला भयदर्शक[१७]-प्रखर-वात ॥
कोणीं कोणां जाणें न मंत्र जपती सुविप्र[१८] खरवांत[१९] ॥ २३७ ॥

## ब्रह्मदेव कश्यपास इंद्र व कृष्णाचें युद्ध आटोपावयास सांगतात.

पौत्रांसी[२०] द्रुहिण[२१] वदे मारीचा[२२] तूर्ण[२३] मुनिवरा जा बा ॥

---

१ वातास्त्र. २ उगाच. ३ ब्रह्माहीं. ४ हजार बाणानीं. ५ सिंहनाद. ६ हत्तीच्या आंगांतून. ७ रक्ताची. ८ गळती. ९ प्रफुल्लितपळस. १० ऐरावताला. ११ व्रण ( खटें ) त्यावेगळा. १२ तोडले आहेत पर्वत ज्याणें असा. १३ हत्तीला. १४ दिशांचा भडाका. १५ भूकंप. १६ पर्वतांच्या टेंकड्या. १७ भयसूचक-तुफानवारा. १८ जगाचे कल्याणेच्छु ब्राह्मण ( ऋषी ). १९ आकाशांतील शब्दांच्या घोळांत. २० नातवास. २१ ब्रह्मा. २२ कश्यपा. २३ लौकर.

मध्यें पुत्र निवारीं तूं यदुजा[1] तूंचि देवराजा[2] बा[3] ॥ २३८ ॥

**ब्रह्माज्ञेनें कश्यप जातात.**

ब्रह्माज्ञेनें कश्यप रथस्थ[4] समरांतरीं सदार[5] तयां ॥
मध्यें गेला तों ते रथ सोडुनि वंदिती त्वरें पितयां[6] ॥ २३९ ॥

## अदिती, इंद्र व कृष्णाची मैत्री करिते.

**इंद्रवज्रा.**

ते न्यस्तशस्त्रात्मज[7] वंदितांची ॥ हस्तीं धरूनी अदिती सुतांची ॥
मैत्री करी सत्वर देखतांची ॥ मार्जी करें रुक्‌ वर दे खतांची ॥२४०॥

**गीती.**

**अदितीचें सांत्वनवाक्य.**

स्वल्पार्थास्तव कलहा-करणें हें योग्य काय भावांस ॥
मशकोपद्रव-झाला मोडावा ह्मणुनि सुभावास[8] ॥ २४१ ॥
जरि मद्वच दोघांतें श्रोतव्य असेल तरि करा स्नपनें[10] ॥
तपनें[11] विलोकुनि तीर्थी जातां करिती परस्परालपन[12] ॥ २४२ ॥

**इंद्र, कृष्णाशी सप्रेम बोलतात.**

शक्रें[13] वदे हरिलागीं[14] मजला दिधला तुवां स्वरावास[15] ॥
माझा वडिलाचा अपमान बरें त्वां कसा करावास ॥ २४३ ॥

## इंद्र व कृष्ण, कश्यप अदितीस, वंदतात.

सुस्नात-सूनु[16] येउनि वंदिति पायांस कश्यपादितिच्या ॥
ससुतादितिस विलोकुनि वर्णिति भाग्यास सत्यपादि[17] तिच्या ॥२४४॥

## जेथें इंद्र व कृष्णाचें सख्य जाहलें त्याठिकाणास नाव देऊन मुनी स्वर्गी जातात.

जेथें संगत हरि ते मुनि त्या-विषयास[18] इष्टसंगमन ॥

---

१ कृष्णाला. २ इंद्राला. ३ बाप. ४ रथांत बसलेला. ५ बायको सह. ६ आईबापांस. ७ हत्यारें ठेवलेले पुत्र. ८ पीडा. ९ चांगलें घर. १० स्नान. ११ सूर्य. १२ एकमेकांशी संभाषण. १३ इंद्र. १४ कृष्णांप्रत. १५ स्वर्गस्थान. १६ पुत्र. १७ ब्रह्मादिक. १८ देशास.

आख्या देउनि सामर[1] करिते झाले त्रिविष्टपीं[2] गमन ॥ २४५ ॥

## मग कश्यपादिकही स्वर्गी जातात.

मारीचादितिशक्रो-पेंद्र[3] विमानीं बसून चवघे ते ॥
गेले स्वर्गी ते बहु धन्यचि तद्दर्शनोत्थ[4]चव घेते ॥ २४६ ॥

## अदिति कृष्णास वृक्ष देते.

ती रात्र शक्रसदनीं राहुन दुसरे दिनीं अदिति कृष्णा ॥
प्रति बोले तरु नेकीं पुरवि वधूची सुखें मुला तृष्णा ॥ २४७ ॥
व्रत होतांचि द्रुम हा ठेवीं नंदनवनीं निजस्थानीं ॥
कीं न धरावा तुजशी दुर्भाव जरा त्रिविष्टपस्थानीं ॥ २४८ ॥

## कृष्ण, कश्यपादिकांस नमून वृक्ष व आणखीं ही प्रीति-दानें घेऊन रैवतकपर्वतीं येतात.

कृष्णें सादिति-कश्यप पुलोमजायुत-महेंद्रही नमुनी ॥
केलें प्रस्थान यदाधारें[11] रमतो सुदुःखहीन मुनी ॥ २४९ ॥
पौलोमी दे कृष्णा जीं प्रिय जावांस न मितें[12]दानें तीं ॥
घेउनि वयनीतें हरि जातां स्थानास नमि तदा ने तीं ॥ २५० ॥
गरुडध्वजरथ सात्यकि-मन्मथ[13]-युत पारिजात-समवेत[14] ॥
रैवतकीं सुरसुमनो[15]भिवृष्ट निमिषेंकरूनि हरि येत ॥ २५१ ॥

## इंद्रवज्रावृत्त.

आणूनि तेथें उतरी नगांतें[16] ॥ विश्रांति दे कृष्ण तया खगांतें ॥
जो शोभवी रैवतक-स्वर्गातें[18] ॥ तया हरीचें सुचरित्र गा तें ॥ २५२ ॥

---

१ देवसहित. २ स्वर्गी. ३ कृष्ण. ४ त्यांच्या दर्शनापासून उत्पन्न जाहलेलीरुचि. ५ पारिजातवृक्ष. ६ देवांनीं. ७ आदिति सहित. ८ इंद्राणी सहित. ९ इंद्र. १० गमन. ११ ज्याच्या आधारानें. १२ ज्यांची संख्या केली जात्ये अशादेणग्या. १३ मदनयुक्त. १४ युक्त. १५ देवांनी पुष्पवृष्टी केलेला. १६ वृक्षातें. १७ गरुडातें. १८ रैवतक पर्वतातें.

## गीति.

### कृष्ण सात्यकीस पारिजात द्वारकेंत नेण्याची तयारी ठेवण्यास सांगतात.

हरि सात्यकिस वदे म्यां हरिलें स्वर्गस्थपारिजाताला ॥
ताताला मातेला कळवीं हें वृत्त शूरजाताला[1] ॥ २५३ ॥
अद्य द्वारवतीप्रति नेतों हा वृक्ष शोभवा नगर ॥
पीडा यदाश्रितास[2] न बाधे स्मरतां[3] जसें भवा न गैर[4] ॥ २५४ ॥

## इंद्रवज्रा.

### सात्यकी सर्वयादव आणून कृष्णास नमितो.

घेऊनि ये सात्यकि यादवांस ॥ आला पुढें पुष्पसुमंदवास ॥
जो शामक त्रासमहादवास[5] ॥ वंदीत तो घेउनि माधवास ॥२५५॥

## गीति.

### सर्वयादव थाटानें पारिजातक द्वारकेंत नेतात.

अग्रीं गरुडस्थद्रुम कामादिक-सर्व-यदुज[6] मागुन ते ॥
प्रेमें रथस्थ जाती त्या उत्साहांत सर्व विश्व रते ॥ २५६ ॥
गर्दीनें दरवाजे भरले ते धन्य मोददरवा[7] जे ॥
वाजिसमा[8] घेती त्यामध्यें हरिपांचजन्य-दर[9] वाजे ॥ २५७॥
गाजे यश हें त्रिजगीं साजे हरिकार्य योग्य हरि[10] लाजे ॥
राजेहि देखती ते आजे झाले वयस्थ[11] तरुला जे ॥ २५८ ॥

## दिंडी.

अशा आनंदें द्वारकेंत नेला ॥ वृक्ष देखोनीं सर्व शोक गेला ॥
असें स्वःश्रेय[12] द्वारकाजनाला ॥ सर्व लावीती माधवीं मनाला॥२५९॥

---

१ सर्व शूरवर्गाला. २ पारिजाताचा आश्रय करणाऱ्या जीवाला. ३ रुद्राला. ४ विष. ५ त्रासरूपी वणव्यास. ६ यादव. ७ आनंददायक. शब्दाला. ८ अमृता सारख्या. ९ शंख. १० इंद्र. ११ तरुण. १२ स्वर्ग सुख.

## द्वारकेंत आलेल्या पारिजातकाचें वर्णन.

### साक्या.

सेवा तरुचरिता रंगें ॥ वरिलें ज्यापरि सारंगें[1] ॥ ध्रु० ॥
मंदाराचा पुष्पगंध तो घ्याया भ्रमरहि येती ॥
स्वर्गींचे जे पुरांत हरिच्या सुख आनंदें घेती ॥ १ ॥
गुंजारावें[2] पुंजे[3] हिंडतां भासे मधुप[4]गणाचा ॥
सामें[5] गातां असाच बहुधा द्विजमेळा[6]ही साचा ॥ २ ॥
सायंकाळीं वाटिकांतरीं ज्याचा परिमळवारा ॥
घेतां जातो प्रताप रविचा दिनसंबंधी सारा ॥ ३ ॥
ज्या पुष्पाचा वृंतवर्ण[7] तो सायंतन-रविरंगें ॥
केला भासे प्रवाळमद[8]ही गमला तेणें भंगे ॥ ४ ॥ ॥ २६० ॥

## श्रीकृष्ण वसुदेवादिकांस नमस्कार करून वृक्ष सत्यभामेच्या घरीं आणितात.

### गीति.

हरिनें वसुदेवादिक-बलदेवादिक-वरिष्ठ ते नमिले ॥
ज्येष्ठत्व नम्रतेविण लोकीं निश्चित कनिष्ठते न मिळे ॥ २६१ ॥
हरि घेउनियां तो मग नग[9] खगवाह[10] स्वकीयभवनास ॥
आला पावे तेव्हां सत्येचा क्रोध[11] पुष्पभव[12] नास ॥ २६२॥

## वृक्षपाहून सत्यभामानटून श्रीकृष्णास प्रीती दर्शविते.

### शिखरणीवृत्त.

तरु देखे जेव्हां स्वसदन-महाचत्वर[13]तलीं ॥

---

१ चातक पक्ष्यानें किंवा भ्रमरानें. २ गुंजारवानें. ३ समुदाय. ४ भ्रमरवर्गाचा. ५ सामवेदमंत्र. ६ ब्राह्मण समुदाय. ७ देंठाचा रंग. ८ पोंवळ्याचा ताठा. ९ वृक्ष. १० गरुडारूढ. ११ रोष. १२ पुष्प रुक्मिणीस दिल्यामुळें उत्पन्न-झालेला. १३ आपल्या घराच्या मोठ्या आंगण्याच्या तळवटांत.

हरीतें सत्कारी स्वविभवभरें रूप नटली ॥
मनीं जी आली ती कुसुमजनित-भ्रांति फिटली ॥
द्रुमा घे आनंदें मति हरिपदाब्जीं विनटली ॥ २६३ ॥

## मग सत्यभामा नारदाज्ञेनें पतिदानात्मकपुण्यव्रत करिते.

## गीति.

तो पारिजात सत्यान्वितहरिला होतसे सुखद फार ॥
मग हर्षभरें देवी करी सुपुण्यव्रतार्थ-संभार ॥ २६४ ॥
मग नारदही येउनि झाला पुण्यव्रतीं चमत्कार ॥

## कवि, ग्रंथांतीं मंगलाचरण करितो.

नारद हरिप्रिय असा त्याला कविचा असो नमस्कार ॥ २६५ ॥

ह० वि० प० अ० ७५

## कवि, आख्यानाची फलश्रुति व आपलें मूळठिकाण वगैरे लिहून आख्यान पुरें करितो.

रामक्षेत्रांतर्गत-राजपुरः-पश्चिमस्थ-गोस्थानीं ॥
ज्याचे वास्तव्य असे पित्रार्द्यर्जित-सुरामसंस्थानीं ॥ २६६ ॥
ज्याचा राम पिता ऋक्पाठी सच्छील जानकी अंबा ॥
नरहरिचरणाब्जरजावाचुनि जीं मानिती जगा स्तंबा ॥२६७॥
ही पारिजातलीला लिहिली कविनें यथार्थ हरिवंशीं ॥
तीतें वर्णी जो नर त्याच्या जन्मेल सत्य हरि वंशीं ॥ २६८ ॥
ज्याचा गुरु रामाभिध काव्यकलानिपुण तर्कतंत्रज्ञ ॥

---

१ आपल्यां संपत्तीच्या थाटानें. २ रुक्मिणीचे मोठेपणाचा संशय. ३ वृक्षाला. ४ सत्यभामायुक्तकृष्णाला. ५ परशुरामक्षेत्रांत (रत्नागिरी जिल्ह्यांत) जें राजापुर त्याच्या पश्चिमेकडे देवाचे गोठणें या गांवीं. ६ वडिलोपार्जित. ७ परशुरामाचें जेथें मंदिर ( देवालय ) आहे त्या ठिकाणीं. ८ ऋग्वेदाध्ययन केलेला. ९ माता ( आई ). १० तृणतुल्प अशातें. ११ हरिवंश नावाच्या श्रीव्यासोक्त ग्रंथामध्यें. १२ न्यायशास्त्रज्ञ.

मंत्रज्ञ व्यवहारीं ज्याचा वरिती समस्त मंत्र[1] ज्ञ[2] ॥ २६९ ॥
काशीनाथ[3]-ज्योतिर्विदनुज हृदयस्थनरहरि[4]प्रेषें ॥
त्र्यंबक कृष्णचरित्रा-वदला तत्प्रीतिरस्तु[5] तत्तोषें[6] ॥ २७० ॥

---

१ विचार ( मसलत ). २ ज्ञाते. ३ काशी नाथ जोशी यांचा कनिष्ठ बंधु. ४ हृदयांतील नरहरीच्या प्रेरणेनें. ५ त्या श्रीकृष्णाची प्रीति असो. ६ श्रीनरहरि संतोषानें.

REFBK-0019461
REFBK-0019461

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे